www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ३५ सोमवार दि. १३ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# मंडणगड दिवाणी व फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचे उद्घाटन

## समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी खर्चात कमीत कमी वेळेत न्याय

## बाबासाहेबांचे आर्थिक आणि सामाजिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल - सरन्यायाधीश भूषण गवई








**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी, प्रतिनिधी :** मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल. जेणेकरुन बाबासाहेबांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.

मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या हस्ते आज झाले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.

सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या हस्ते कळ दाबून न्यायालय इमारत प्रांगणातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे तसेच म्युरलचे अनावरण करण्यात आले. यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. न्यायदान कक्षाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश श्रीमती जोशी यांना आसनावर विराजमान करण्यात आले. येथील ग्रंथालयाचेही उद्घाटन आणि पहाणी सरन्यायाधीशांनी केली.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या प्रांगणात झालेल्या समारंभात मार्गदर्शन करताना सरन्यायाधीश श्री. गवई म्हणाले, आजचा महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. न्यायमूर्ती म्हणून मला २२ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन आणि आजच्या मंडणगड न्यायालय इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्यक्रम या माझ्या २२ वर्षातील महत्त्वाचे आहेत. अतिशय कमी वेळेत मंडणगड येथे न्यायालय सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री महोदयांनी घेतला. त्याच्या भूमिपुजनाला आम्ही दोघे उपस्थित होतो आणि आजच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमालाही आम्ही दोघे उपस्थित आहोत. हा गौरवाचा क्षण आहे. महाराष्ट्र शासन विशेषत: विधी व न्याय विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी आभार मानतो, त्यांनी मला या इमारतीच्या उद्घाटनाची संधी दिली.

अवघ्या २० दिवसात कोल्हापूर येथील जुन्या इमारतीचा कायापालट करुन खंडपीठ सुरु केले. नाशिक, नागपूर, मंडणगड येथील इमारती पहा. विविध तालुक्यातील न्यायालयांच्या इमारती, माझ्या दर्यापूर तालुक्यातील इमारत पहा. मी अभिमानाने सांगू शकतो, देशातील कुठल्याही तालुक्यामध्ये या स्तरीची न्यायालये असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती देशातल्या कुठल्याही तालुक्यात असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती समहाराष्ट्र शासनाने उभ्या केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ८ ऑक्टोबर २०२३ रोजी गवई साहेब आणि मी या न्यायालयाचे भूमिपुजन केले. २ वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशय सुंदर इमारत उभी केली आहे. कोल्हापूरचे खंडपीठ झाले, सरन्यायाधीश गवईंच्या नेतृत्वात आणि सल्ल्याने हा प्रवास २०१४ पासून सुरु झाला. न्यायालय आणि सरकार यामध्ये दुवा म्हणून ते लक्ष देत आहेत. सातत्याने त्यांचे लक्ष राहीले होते. २०१४ ते २०२५ पर्यंत जवळपास दीडशे न्यायालये आणि इमारतींना मान्यता दिली आणि त्याचे काम सुरु केले. त्यातील अनेक इमारती पूर्ण केल्या आहेत. याचे श्रेय गवई साहेबांना जाते. सातत्याने सरकारसोबत संवाद करुन आणि त्यातील अडचणी दूर करुन आमच्याकडून या सगळ्या गोष्टी करवून घेतल्या. मी वकील असल्यामुळे उपमुख्यमंत्री असताना विधी व न्याय हा विभाग माझ्याकडे मागून घेतला होता. शिंदेसाहेब मुख्यमंत्री असताना २९ वेगवेगळ्या न्यायालयीन पायाभूत सुविधांना मान्यता दिली.

चिपळूण न्यायालय इमारतीची केलेली मागणी तात्काळ मंजूर करु. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे येथील स्मारकाच्या आरखड्याला वेग देण्याचे काम करु, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, मंडणगडचे न्यायालय हे अतिशय महत्त्वाचे आहे.

पान २ वर

## विद्यार्थ्यांनी बनविले आकाशकंदील



**दैनिक युवक आधार**

**शिवाजी पवार सेलू तालुका परभणी**

शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी आकर्षक आकाशाकंदील तयार केले. दीपावली सणानिमित्त कार्यानुभव विषयाअंतर्गत हा उपक्रम घेण्यात आला.विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी,नवनिर्मिती क्षमता विकसित होण्यासाठी स्वनिर्मित आकाशकंदील तयार करण्याचा उपक्रम सौ.रागिणी जकाते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या या कलाकृतीचे स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष हरिभाऊ चौधरी,कार्यवाह उपेंद्र बेल्लुरकर,शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी, मुख्याध्यापक शंकर शितोळे,शंकर राऊत,अनिल कौसडीकर आदींनी कौतुक केले.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे द्वितीय वर्ष एम. बी. बी. एस परीक्षेत उत्तुंग यश



**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकतर्फे ऑगस्ट 2025 महिन्यात घेण्यात आलेल्या द्वितीय वर्ष एम. बी. बी. एस परीक्षेमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने उत्तुंग यश मिळविले आहे. या संस्थेचा निकाल महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सर्वात जास्त म्हणजेच 100 टक्के लागला आहे. सन 2024 या वर्षी झालेल्या प्रथम वर्ष एम. बी. बी. एस परीक्षेमध्ये देखील महाविद्यालयाचा निकाल राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सर्वात जास्त म्हणजेच 99टक्के इतका लागला होता. या यशाबद्दल पालकमंत्री डॉ. उदय सामंत व आमदार किरण सामंत यांनी अधिष्ठाता, डॉ. जयप्रकाश रामानंद तसेच सर्व अध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा निकालातील क्रमवारी खालील प्रमाणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी100 टक्के, राजीव गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ठाणे98.90 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग – 98 टक्के, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर -97.96 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार - 96.90 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर 96 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी - 96 टक्के, बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे - 95.60 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर - 95 टक्के, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई - 94.42 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज - 94.40 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला - 94.20 टक्के, टोपीवाला नॅशनल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई 94.07 टक्के, लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई -93.93टक्के, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर - 93 टक्के, . शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव - 93 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर- 93 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग 93टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड -92 टक्के, सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई 91.53 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजीनगर - 91.50 टक्के, डॉ. वैशंपायन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर - 91 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती - 90 टक्के, आर्म फोर्ससेस मेडिकल कॉलेज, पुणे -90 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव - 98.90 टक्के, हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, मुंबई- 89 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया - 88.66 टक्के, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे -88टक्के,

विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांची विषयवार संख्या- औषधशास्त्र 8, सुक्ष्मजीवशास्त्र 7 व विकृतीशास्त्र 5अशी आहे.









## पान १ वरून...

### मंडणगड दिवाणी व फौजदारी...

या न्यायालयामुळे चार-साडेचार लाख लोकांना हे न्यायालय मध्यवर्ती पडणार आहे. लोकांचा प्रवास, पैसा वाचणार आहे. ही केवळ इमारत नसून, लोकांकरिता न्यायदानाची एक गतीशील व्यवस्था तयार झाली आहे. याचे शंभर टक्के श्रेय गवई साहेबांना आहे. प्रलंबित खटले वेगांनी निकाली निघतील. संविधानकार भारतारत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला सुंदर संविधान दिले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला संधीची समानता देखील आहे आणि प्रत्येकाला न्याय देखील आहे. महाराष्ट्राचे सरकार म्हणून ही जबाबदारी चांगल्या पध्दतीने पार पाडू, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, वंचिताना न्याय देण्यासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्य वेचले, त्यांचा पुर्णाकृती पुतळा या न्यायालयात आहे. न्यायाचे हे मंदिर आहे, घटनेचे मंदिर आहे. याची जाणीव हा पुतळा करुन देईल. या इमारतीचे भूमिपुजन आणि उद्घाटन देखील सरन्यायाधीशांच्या हस्ते झाले. यातून शासन विशेषत: सार्वजनिक बांधकाम विभाग सक्षम असल्याचे दाखवून दिले आहे. समाजातील शेवटच्या घटकातील माणसाला न्याय मिळाला पाहिजे ही बाबासाहेबांची संकल्पना होती. आज या इमारतीसाठी काम करणाऱ्या कामगांराचा सरन्यायाधीशांच्या हस्ते सत्कार करुन ती पूर्ण झाली आहे. न्याय गावा, गावांमध्ये मिळाला पाहिजे ही दूरदृष्टी सरन्यायाधीशांची. सर्व सामान्यांमधले असामान्य कर्तृत्ववान व्यक्तीमत्त्व आणि भारतीय न्याय व्यवस्थेचे ते भूषण आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय पोहचविण्याचे काम न्यायालय करत असतं. म्हणून न्यायालयांना देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये आम्ही काटकसर करत नाही. या मंदिरातून सर्वसामान्यांना न्याय मिळून खटले लवकर निकाली निघतील, असेही ते म्हणाले.

पालकमंत्री डॉ. सामंत म्हणाले, ४० हजार लोकवस्तीच्या गावात दिवाणी व फौजदारी न्यायालय असणारे देशात एकमेव मंडणगड असावे. खेडला सेशन कोर्टाला नवीन न्यायालय बांधावे, चिपळूण न्यायालयासाठीचा प्रस्ताव पाठवला आहे, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. आंबडवे गावच्या स्मारकाचा आराखडा तयार झाला आहे. तो पूर्ण करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.


उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, न्यायमूर्ती श्री. कर्णिक यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. पालकन्यायमूर्ती श्री. जामदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर वकील संघाचे अध्यक्ष श्री. लोखंडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, संविधान उद्देशिका आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. दीपप्रज्जवलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास वकील, पक्षकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खंडाळे ग्रामपंचायतीचा धक्कादायक घोटाळा ; शासकीय जागेची परस्पर विक्री उघडकीस ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रायगड जिल्ह्यात "हफ्ता राज" माजला आहे .प्रॉपर्टी कार्डवरील बनावट नोंदी, जागेवर नसलेली घरे आणि अधिकाऱ्यांची हातमिळवणी उघड! रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील खंडाळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत शासकीय जागेची बनावट व्यवहारांद्वारे विक्री झाल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे.ग्रामपंचायत रस्ता बंद करून शासनाची जागा विकली गेल्याची गंभीर तक्रार संगमपाडा गावातील नागरिक महेश मनोहर पेडणेकर व ग्रामस्थांनी पंचायत समिती अलिबागकडे केली होती. चौकशीदरम्यान अनेक घरांच्या खोट्या नोंदी आणि अस्तित्वात नसलेली बांधकामे उघडकीस आली आहेत. शासनाच्या जागेवरच व्यवहार!चौकशीअंती स्पष्ट झाले की प्रॉपर्टी कार्ड क्र. 124 मधील शासनाची जमीन ग्रामसेवक आणि काही ग्रामपंचायत सदस्यांच्या संगनमताने विकण्यात आली.

६ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या प्रत्यक्ष चौकशीत घर क्र. 116 ते 120 पर्यंतची पाचही घरे प्रत्यक्षात जागेवर आढळली नाहीत, मात्र ग्रामपंचायत नोंदींमध्ये त्यांची असेसमेंट करण्यात आली होती.या प्रकारातून स्पष्ट होते की ग्रामपंचायत दप्तरी खोटी घरे बसवून बनावट करनियम तयार करून व्यवहार रचला गेला."दप्तरी घरे आहेत, पण जमिनीवर नाहीत!" ग्रामपंचायतीच्या अहवालानुसार खालील घरे नोंदीनुसार अस्तित्वात असूनही जागेवर सापडली नाहीत.घर क्र. 116 (400 चौ.मी.),घर क्र. 117 (400 चौ.मी.),घर क्र. 118 (900 चौ.मी.),घर क्र. 119 (625 चौ.मी.),घर क्र. 120 (864 चौ.मी.)तसेच घर क्र. 122, 124, 125 आणि 127 यांची नोंद आहे पण ही घरेही अस्तित्वात नाहीत.ही "भूतघरं" म्हणजेच भ्रष्टाचाराचं थेट पुरावा आहेत. अधिकारी, कर्मचारी आणि राजकीय संगनमत?ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सिटी सर्व्हे अधिकारी व ग्रामसेवकांनी ठराविक लोकांच्या नावाने खोट्या घरपट्ट्या देऊन जागेचे पाच प्लॉट तयार केले."शासनाचे लक्ष नाही, वरचा हिस्सा ठरलेला आहे" या समजुतीतून अधिकाऱ्यांनी बिनधास्त व्यवहार केले.



काही ग्रामसेवक तर उघडपणे म्हणतात "कोणाला कम्प्लेंट करा, आम्ही कोणाला घाबरत नाही! हप्ता वरपर्यंत जातो!"हा संवादच रायगड जिल्ह्यातील हफ्ता संस्कृतीचा आरसा आहे. गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश,चौकशी अहवालाच्या आधारे गटविकास अधिकारी (नि. श्रे.) डी. एच. दाईगडे यांनी ग्रामपंचायत खंडाळे यांना शासनाच्या ३१ डिसेंबर २०१५ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.या आदेशामुळे आता संपूर्ण प्रकरणाला प्रशासकीय गती मिळण्याची शक्यता आहे.सामाजिक कार्यकर्त्यांची मागणीअशी आहे की सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत म्हणाले की "अनेक ग्रामपंचायतींमध्ये एकाच जागेवर दोन नावे, तर काही ठिकाणी अस्तित्वात नसलेल्या घरांना असेसमेंट देण्याचे प्रकार सुरू आहेत. रायगड जिल्हा प्रशासन व ग्रामविकास विभागाने सर्व ग्रामपंचायतींचे ऑडिट करून जबाबदारांवर फौजदारी कारवाई करावी."रायगड जिल्ह्यात "पैसा बोले तो सिस्टम झुके!"रायगड जिल्ह्यात राजकीय पुढाऱ्यांचा वरदहस्त असलेले अधिकारी भ्रष्टाचारात आकंठ बुडालेत. एक घोटाळा बाहेर आला की दहा नवे सुरू होतात!शासकीय अधिकारी आणि कर्मचारी खुलेपणाने सांगतात "आमचं कोणी काही वाकडं करू शकत नाही."हा भ्रष्टाचार आता प्रशासनाच्या डोक्यावरच बसला आहे!पंतप्रधान नरेंद्र मोदींचं घोषवाक्य हरवलं का?पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेलं वचन -"मैं नहीं खाऊंगा और किसी को खाने नहीं दूँगा"रायगड जिल्ह्यात अक्षरशः पायदळी तुडवलं गेलं आहे.

शासकीय यंत्रणा, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासनामध्ये भ्रष्टाचाराचा सुळसुळाट झाला आहे. जनतेचा विश्वास हरवत आहे आणि शासनाची प्रतिष्ठा धुळीस मिळते आहे. जबाबदार कोणअसा प्रश्न पडला आहे? जनतेचा रोष वाढत असून खालील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे .मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार,गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,ग्रामविकास सचिव एकनाथ डवले,रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे,रायगड जिल्हा परिषद मुख्याधिकारी नेहा भोसले,हे सर्वजण आता जनतेसमोर उत्तरदायी आहेत रायगडमध्ये भ्रष्टाचार थांबवण्यासाठी काही ठोस पावलं उचलणार का? जनतेचा सवाल ? "सरकारी जमिनी विकल्या जात असताना शासन झोपलंय काग्रामपंचायतींमधील हफ्ता राज संपवायचा कोणाकडे धाडस आहे का?"रायगड जिल्ह्यातील हा घोटाळा फक्त एक उदाहरण आहे ,पण ही ठिणगी संपूर्ण जिल्ह्याच्या भ्रष्ट कारभाराला धक्का देऊ शकते.

# जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेत किशोर गटात शारदा स्पोर्ट तर किशोरी गटात विवेकज्ञान मंदिर सर्व प्रथम

## निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचा श्री.रणविर पंडित यांच्या उपस्थित समारोप

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** शिक्षणमहर्षी शिवाजीराव दादा पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा कबड्डी असोशिएशन व शारदा स्पोर्ट अकॅडमी गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा कबड्डी निवड चाचणी स्पर्धेत एकुण ३० संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत किशोर(मुले) गटात शारदा स्पोर्ट अकॅडमी गेवराईचा संघ सर्वप्रथम आला तर किशोरी(मुली)गटातुन विवेकज्ञान मंदिर क्रिडा मंडळ, बर्दापूर संघ सर्व प्रथम आला. कुमारी गटातुन शारदा स्पोर्ट अकॅडमी गेवराईचा संघ सर्व प्रथम आला. किशोर गटातुन किशोर नानख हंबर्डे क्रिडा मंडळ, आष्टीचा संघ द्वितीय आला असुन किशोरी गटातुन शारदा स्पोर्ट गेवराईचा संघ द्वितीय आला. तर कुमारी गटातुन किशोर नाना हंबर्डे क्रिडा मंडळ, आष्टीचा संघ द्वितीय




आला. या स्पर्धेचा समारोप युवा नेते श्री. रणविर पंडीत यांच्या उपस्थित समारोप संपन्न झाला. श्री.रणवीर पंडीत यांनी विजयी संघाचे अभिनंदन! करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्रा.डॉ.ब्रम्हनाथ मेंगडे, प्रा. वनगुजरे, प्रा.सानप सर यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत पंच म्हणुन प्रा.कैलास जगदाळे, प्रा. डॉ.केतन गायकवाड, प्रा.प्रविण शिलेदार, श्री. सुरेश चौधरी, श्री.नितीन गर्जे, श्री.श्रीराम इंगळे यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.कलंदर पठाण यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.वंदन जाधव, प्रा.केशव सुर्वे व श्री.मधुकर धुताडमल सह आदीनी अथक परिश्रम घेतले.

# सालेवडगाव गणेशवाडी रस्ता पाण्यात, ग्रामस्थांचे हाल — अँड. संभाजी दहातोंडे करणार पाण्यात उभे राहून उपोषण

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

आष्टी तालुक्यातील सालेवडगाव गणेशवाडी रस्ता सध्या पाण्याखाली गेल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. सततच्या पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी व चिखल साचला आहे. त्यामुळे वाहनचालक, शालेय विद्यार्थी आणि ग्रामस्थांना ये-जा करण्यास प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न




झाल्याने नाराजी व्यक्त केली आहे. या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांचा संयम सुटला असून अँड. संभाजी दहातोंडे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी थेट पाण्यात उभे राहून उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.गावकऱ्यांनी सांगितले की, "रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. दुरुस्तीच्या मागणीसाठी आम्ही वारंवार प्रयत्न केले, पण प्रतिसाद मिळाला नाही. आता उपोषण हाच मार्ग उरला आहे."स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला तातडीने रस्त्याची पाहणी करून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्याची मागणी केली आहे.

# "कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या स्वरांजली देवकरचे ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेत सुयश"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कै रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालय व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या कुमारी



स्वरांजली विजयकुमार देवकर हिने अतिशय परखडपणे व आपल्या बोलीभाषेतून आपले विचार व्यक्त करून स्रोत्यांची मने जिंकली आणि या स्पर्धेमध्ये राज्यस्तरीय उत्तेजनार्थ बक्षिस जिंकत उत्तुंग यश संपादन केले. त्याबद्दल आयोजकांतर्फे प्रशस्तीपत्रक देऊन तिचा गौरव करण्यात आला. या यशाबद्दल तिचे पिलीव व पिलीव परिसरातुन सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनचा वर्षाव होत आहे. व तिच्या या यशाबद्दल कर्मवीर विद्यालयातील मार्गदर्शक शिक्षकांनाही धन्यवाद देण्यात आल्याचे समजते.

# छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आघाडीवर; जनतेच्या मनात 'ट्रिपल इंजिन' सरकारची पसंती

**दैनिक युवक आधार**
**आसाराम विरकर, संपादक ,(मराठवाडा आवृत्ती)**

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका निवडणुकीसाठी राजकीय रणभूमी सज्ज झाली आहे. सत्तेची प्रतिष्ठा, अस्तित्व आणि स्थानिक प्रभुत्व मिळवण्यासाठी भाजपामहायुती आणि उबठा आघाडी, MIM यांच्यात थेट संघर्ष होण्याची चिन्हे दिसत आहेत.

सध्या रणनीतीच्या आधारे भारतीय जनता पक्ष आघाडीवर दिसत आहे. जनतेच्या मनातही भाजपचा चेहरा दृढपणे रुजल्याचे जाणवत असून, 'ट्रिपल इंजिन' सरकार हीच जनतेची भावना असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

भाजपाच्या बाजूने, मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय




राज्यमंत्री भागवत कराड, आणि आमदार संजय केनेकर यांच्यासह भाजपाच्या कोर कमिटी व जिल्हा-शहर कमिटीचे सर्व घटक आणि कार्यकर्ते निवडणुकीसाठी कंबर कसून सज्ज आहेत. तसेच, शहर जिल्हा अध्यक्ष श्री किशोर शितोळे यांनी वार्डनिहाय बैठका चालू करून कार्यकर्त्यांशी संपर्क साधत आणि माहिती गोळा करत रणनिती ठरवण्याचे काम सुरु केले आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक केवळ सत्तेसाठी नसून, शहरातील राजकीय समीकरण आणि स्थानिक गडावर प्रभुत्व राखण्याची महत्त्वाची चाचणी ठरणार आहे. आगामी निवडणुकीत कोण गड जिंकतो, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# घाटंजीच्या विकासासाठी नवा युवा चेहरा: निखिल देठे यांचं नाव नगराध्यक्ष पदासाठी चर्चेत

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि.**
**महेश पेन्दोर**

घाटंजी शहरामध्ये एक नवा, तरुण आणि झपाटलेला चेहरा सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे — निखिल देठे! सामाजिक कार्य, युवक नेतृत्व आणि जनतेच्या समस्या सोडवण्याची तळमळ यामुळे निखिल देठे हे नाव सध्या नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत आघाडीवर आहे.

छत्रपती मोहत्सवाच्या माध्यमातून त्यांनी रुग्णसेवा, अन्नदान, पुरग्रस्तांसाठी मदत



अशा विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. सोलापूर व सांगलीतील पूरग्रस्तांसाठी अशा अनेक ठिकाणी मदत देत सामाजिक कार्य केले आहेत..

निखिल देठे यांचं काम केवळ मोहत्सवापुरतं मर्यादित नाही, तर सामाजिक प्रश्नांवर थेट झुगारून ते गरजूंपर्यंत पोहोचतात. कोणत्याही अधिकाऱ्यापुढे, राजकीय नेत्यापुढे गरिबांची भूमिका ठामपणे मांडतात आणि योग्य तो न्याय मिळवून देतात. अशा लोकहितवादी भूमिकेमुळेच ते 'जनतेचा नेता' म्हणून उदयाला आले आहेत.

अन्नदान छत्राचे मुख्य चालक सूरज हेमके यांसारख्या कार्यकर्त्यांनाही मदतीचा हात देणारे निखिल, अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन एक नवा बदल घडवत आहेत.

त्यांच्या नेतृत्वात घाटंजीमध्ये सकारात्मक घडामोडी घडतील, अशी आशा आता नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

नगराध्यक्ष पदासाठी त्यांची उमेदवारी ही केवळ राजकीय नाही, तर सामाजिक परिवर्तनाची सुरुवात ठरू शकते, असं चित्र आता तयार होत आहे.

# पूर परिस्थितीच्या कार्यकाळात पाटोदा तहसील प्रशासनाची उल्लेखनीय तत्परता

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)**

पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या कार्यकाळात तहसील प्रशासनाने अत्यंत जबाबदारी, संयम आणि तत्परतेने कार्य केल्याचे दिसून आले.

तहसीलदार दत्तात्रय निलावाड, नायब तहसीलदार मोरे साहेब, महसूल सहाय्यक खाडे मॅडम, सर्व तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल सेवक भाग्यश्री वीर यांनी आपले सर्व संसाधनांचा उपयोग करून नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य दिले. पूरग्रस्त भागांचा सतत आढावा घेऊन मदतकार्य, पंचनामे, विस्थापित नागरिकांची व्यवस्था, वीजपुरवठा आणि रस्ते वाहतूक या संबंधी समन्वय साधण्यात आला. या काळात प्रशासनाने दाखवलेली संवेदनशीलता



आणि तत्परता ही लोकसेवेचे आदर्श उदाहरण ठरली. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचे कौतुक करत, "आपत्तीच्या काळातही अधिकारी व कर्मचारी जनतेसोबत खंबीरपणे उभे राहिले" असे मत व्यक्त केले आहे.

दैनिक युवक आ (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## कै.बाळाराम लबडे स्मरणार्थ अखंड हरिनाम व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : खानावळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा उद्योजक मोहन लबडे यांच्या वडिलांच्या अर्थात कै. बाळाराम कोंडाजी लबडे यांच्या स्मरणार्थ ५ दिवसीय हरीनाम उत्सव तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्री क्षेत्र गहिणीनाथ गड, चिंचोली (नाथ) ता. पाटोदा, जि. बीडच्यावतीने गुरुवर्य महंत आनंदजी महाराज खंडागळे - चौक गुरुवर्य जगन्नाथबाबा रत्नाकर, श्री क्षेत्र संगम यांच्या आशीर्वादाने हा सोहळा पार पडला.

यावेळी ह.भ.प. दामोदर सिताराम लबडे ( खानावळे-पनवेल ), ह.भ.प. काशिनाथ महाराज लबडे ( खानावळे-पनवेल ), ह भ प शांताराम सिताराम लबडे (खानावळे-पनवेल), ह.भ.प. चैतन्य महाराज अनंतजी महाराज खंडागळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदर पारायण सोहळ्याची व्यवस्था श्री सदगुरु माऊली सेवा मंडळ, चौक, संत तुकाराम महाराज वारकरी मंडळ बारवई पुल परिसर पनवेल-खालापूर तालुका यांनी केले तर या सोहळ्याचे आयोजन मोहनशेठ



बाळाराम लबडे आणि सौ. योगिता मोहन लबडे यांनी केले होते. यावेळी पार पडलेल्या ५ दिवसीय पारायण सोहळ्याला परिसरातील शेकडो नागरिकांनी उपस्थिती दर्शविली होती.

# रील बनवण्यासाठी हातात घेतला कोयता, शेवटी गाठ पडली पोलिसांशी!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**लासलगाव:-** परिसरात काही तरुणांनी हातात कोयते घेऊन "चोरों के साथ दोस्ती की है, कुत्तों के साथ होली मनायेंगे" असे संवाद असलेली रील तयार करून ती सोशल मीडियावर व्हायरल केली होती. या रीलमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. समाजमाध्यमांचा गैरवापर करून गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रोत्साहन दिल्याप्रकरणी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत या तरुणांना ताब्यात घेतले आहे.नाशिक ग्रामीण



पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व लासलगाव पोलिस ठाण्याचे निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. नाशिक पोलिस आणि लासलगाव पोलिस यांच्या संयुक्त पथकाने या टोळक्याला शोधून काढले.

**ताब्यात घेतलेले तरुण म्हणजे** — समाधान टोंगरे (सोनगाव, दिंडोरी), खंडू टोंगरे, विजय बोंबले ( फोफाळवाडे), दीपक वाघमारे (उमराळे) आणि समीर जाधव (सोनगाव).या कारवाईत पोलिस अधिकारी अविनाश सांगळे,सुरेश मुरकुटे, जालिंदर खराटे, सचिन पिंगळे, मंगेश गवस, तसेच सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या पथकातील कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून अधिक तपास सुरू आहे.

या प्रकरणात पोलिसांकडून प्राथमिक तपासात असेही समोर आले की संबंधित तरुणांनी गावातील इतर काही व्यक्तींचा प्रभाव दाखवण्यासाठी आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी ही रील तयार केली होती. मात्र या कृतीमुळे समाजात चुकीचा संदेश गेला असून, कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.लासलगाव पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, समाजमाध्यमांवर अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या रील्स तयार करू नयेत. अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल. सोशल मीडियाचा वापर सकारात्मकतेसाठी करावा, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

# पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे अभय नगर येथे रस्त्यांची दुर्दशा

## वारंवार तक्रार करूनही अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार,**
**मेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेतील दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या अभय नगर येथे रस्त्याच्या मधोमध मोठ्या प्रमाणात पाण्याचे पाईप लिकीज असल्यामुळे रस्त्यावर पाणी साचून मोठ्या प्रमाणात रस्त्यावर चिखल तयार झाला आहे.यामुळे येथील रहिवाशी आणि शाळकरी मुलांना ये- जा करण्यास नाहक त्रास सहन करावा लागत आहे, तसेच या लिकिज असलेल्या कनेक्शन मधून पुन्हा पाणी मेन पाईप लाईन मध्ये जाऊन ते नळांद्वारे लोकांच्या घरात येऊन दूषित पाण्यामुळे लोकांना विविध आजारांची लागण होत आहे.दिवा प्रभाग समितीतील पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री. सुरेश वाघेरा यांना गुरुवार दिनांक



९/१०/२५ रोजी दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी तसेच अभय नगरचे रहिवाशी श्री. रमेश राऊत यांनी मेसेज आणि फोन करून सर्व परिस्थिती श्री.सुरेश वाघेरा यांच्या निदर्शनास आणून दिली काही वेळात त्यांचे कामगार तेथे येऊन थातूरमातूर काम आणि सर्व लिकीज तसेच ठेवून निघून गेले.

कल्याण फाटा येथे मेन पाण्याची टाकी असून येथून इतर विभागात पाणीपुरवठा होतो येथे ज्या ठिकाणी कंट्रोल वॉल बसवण्यात आला आहे तो वॉल आज जवळपास दोन ते तीन वर्षापासून लिकीज आहे. पाणीपुरवठा विभागाच्या वारंवार निदर्शनास आणून देऊन देखील हा लिकीज काढण्यात येत नाही. आणि यातून हजारो लिटर पाणी वाया जात असते अभय नगर हा उताराचा भाग असल्यामुळे हे सर्व पाणी अभय नगर मध्ये पाईपलाईन मार्गे येते आणि लिकिज असलेल्या कनेक्शन मधून दररोज पाणी बाहेर येऊन वाहत असते त्यामुळे पूर्ण रस्त्यात चिखल तयार होऊन नागरिकांना ये-जा करण्यास त्रास होतो.जर हे पाणी बंद झाले तर येथील रस्त्याची दुर्दशा होणार नाही,त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने त्वरित वॉलची दुरुस्ती करून गळती होणारे पाणी बंद करावे अशी मागणी नागरिकां द्वारे करण्यात येत आहे. दिवा प्रभाग समितीतील पाणीपुरवठा विभागातील असक्षम अधिकारी यामुळे दिवा प्रभाग समितीतील बहुतांश भागात याच प्रमाणे पाईपलाईन लिकीज होऊन पाण्याची गळती सुरू आहे.

# ऑटो अपघातात तरुणाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी

**दैनिक युवक आधार**
**योगेश चौदंते मुदखेड**

दि.११ रोजी सकाळी ९:२० वाजता मुगट येथील मुख्य रस्त्यावर ऑटो अपघातात गावातील एका युवकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मुगट येथील ऑटो चालक महेश हाटकर (वय २४) ऑटो क्रमांक एम. एच २६ एसी ०४५ हा मुख्य रस्त्यावर सकाळी ९:२० च्या दरम्यान ऑटो घेऊन उभा होता. त्या ऑटोमध्ये सम्राट आनंदा हाटकर वय १७ हा तरुणाला त्यांने बसवून घेतले व दोघे गावात असणाऱ्या रेशन दुकानावर जाणार होते परंतु राशन दुकानावर न जाता महेश ने पुन्हा ऑटो मुदखेड कॉर्नरकडे घेऊन बस स्टॉप कडे फिरवला. वेडा वाकडा ऑटो चालवत बस स्टॉप कडे येत होता त्याच क्षणी रस्त्याने जात असलेल्या बाबुराव कल्याणे वय ५२ यांना त्याच्या ऑटोचा धक्का लागला. ते गंभीर जखमी होऊन रस्त्यावर खाली पडले. त्याच क्षणी ऑटो चालकाचे ऑटो वरील पूर्ण नियंत्रण सुटले व ऑटो पलटीखाला त्यात

ऑटो चालक हा किरकोळ जखमी झाला परंतु ऑटो मध्ये बसलेला युवक हा चांगलाच गंभीर जखमी झाला होता. तात्काळ त्या दोघांनाही गावातील दवाखान्यात हलवण्यात आले परंतु दवाखान्यात जाण्यापूर्वीच सम्राट चा मृत्यू झाला होता तर बाबुराव कल्याणे यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय दवाखान्यात हलवण्यात



आले.

मृत युवक सम्राट हाटकर हा यशवंत कॉलेजमध्ये इयत्ता बारावी चे शिक्षण घेत होता. त्याच्या पश्चात आई, एक भाऊ असा परिवार आहे.( प्रत्यक्षदर्शींच्या सांगण्यानुसार ऑटो चालक महेश हा मध्य धुंद होता त्यांनी मुख्य रस्त्यावर वेडा वाकडा ऑटो चालू लागला त्यामुळे त्यांचे ऑटो वरील नियंत्रण सुटले व हा अपघात घडला असे सांगत होते. )

दुपारी दोन पर्यंत या घडलेल्या घटनेच्या ठिकाणी पंचनामा करण्यात आला नव्हता.

मृत तरुण सम्राट हाटकर याच्या अकस्मात निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे त्याच्या जाण्याने नातेवाईक, मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.. मृत तरुण सम्राट हाटकर याचा अंत विधी मुगट येथील बौद्ध स्मशान भूमी येथे सकाळी ८ वाजता करण्यात येणार आहेत...

# चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार



सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम





गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या.

असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे.

\आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

## रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या महत्वकांशी प्रकल्प रोटरी घनदाट जंगल चा तिसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**नवीन पनवेल :** पनवेलकर नागरिकांच्या लोकसहभागा द्वारे पनवेल शहराच्या मध्यभागी पनवेल महानगर पालिका व रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या घनदाट जंगल प्रकल्पास आज तीनवर्षे पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने सदर प्रकल्पाचा तिसरा वर्धापन मान्यवरांच्या हस्ते केक कापून उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्व मान्यवरांनी प्रकल्पाची पाहणी करून रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे विशेष कौतुक केले.

सदर प्रसंगी माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार बाळाराम पाटील, विस्टा फूड चे संचालक भुपिंदर सिंग, विस्टा फूड चे सल्लागार चंद्रशेखर सोमण, पनवेल महानगर पालिका अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये,, उपायुक्त विधाते, उपायुक्ता रुपाली माने, रोटरी प्रांत 3131 चे प्रांतपाल रो. संतोष मराठे, पुढील वर्षाचे प्रांतपाल रो. नितीन ढमाले, नियोजित प्रांतपाल रो. चारू श्रोत्री, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, श्री. बबनदादा पाटील, श्री. वाय टी देशमुख, श्री. रामदास शेवाळे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगर सेवक रमेश गुडेकर, गणेश कडू, जयंत पगडे, सौ. रुचिता लोंढे समेळ, सौ.डॉ.सुरेखा मोहोकर, सौ. सारिका भगत, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट चे सदस्य श्री. दिवाकर ठोंबरे, पनवेल शहर भाजप अध्यक्ष सुमित झुंझारराव, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे अध्यक्ष अनिल ठकेकर, सचिव अतिश थोरात, प्रोजेक्ट चेअरमन सुदीप गायकवाड यांचे सह सर्व रोटरी सदस्य, एन्स व पनवेल चे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिपळूण पालिकेचा वाचू आनंदें" उपक्रमास वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण (प्रतिनिधी) :**

चिपळूण नगर परिषद, लोकमान्य टिळक स्मारक वाचनालय आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या "वाचू आनंदें" या उपक्रमास चिपळूणकर वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

मुख्याधिकारी माननीय विशाल भोसले यांच्या संकल्पनेतून प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर आणि उपक्रम प्रमुख बापू साडविलकर यांच्या उत्तम नियोजनातून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. एप्रिल महिन्यापासून प्रत्येक रविवारी चिपळूण शहरातील विविध ठिकाणी हा उपक्रम राबविला जात असून, वाचनप्रेमी नागरिक यामध्ये उत्साहाने सहभागी होत आहेत.

या उपक्रमात वाचक दोन तास आपल्या आवडीची पुस्तके वाचत असून त्यानंतर त्या पुस्तकांवर प्रतिक्रिया देतात. आजच्या सत्रात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे अध्यक्ष कवी राष्ट्रपाल सावंत, कार्याध्यक्ष सुनील खेडेकर, नगर परिषदेतील कार्यालय अधीक्षक रोहित खाडे, कर्मचारी वर्ग आणि अनेक वाचकांनी उपस्थिती लावली.

नगर परिषद, दोन्ही वाचनालय संचालक मंडळ आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी पार पडला. विशेष म्हणजे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय या वर्षी आपले रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असून या निमित्ताने विविध उपक्रम राबविले जात आहेत.

"वाचू आनंदें" या उपक्रमामुळे चिपळूणमध्ये वाचनसंस्कृतीला नवे बळ मिळत असल्याची भावना वाचकवर्गातून व्यक्त होत आहे.

# नेरळ परिसरातील 137 कोटींच्या रस्ते विकास कामांचे आ. श्री महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते भूमिपूजन संपन्न



**दैनिक युवक आधार**
**खालापुर- संतोष शेवाळे**

नेरळ शहरातील नागरिकांसाठी आजचा दिवस विकासाचा नवा टप्पा घेऊन आला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या कामांना अखेर गती मिळाली असून, तब्बल १३७ कोटी रुपयांच्या रस्ते विकास कामांचे भूमिपूजन आज शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी कर्जत खालापूर मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार श्री महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते साई मंदिर नेरळ परिसरात उत्साहात पार पडले.

या कामांमध्ये दामत गेट ते आंबिवली पेशवाई मार्ग रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, साई मंदिर ते सुगवे रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, तसेच माथेरान स्वागत कमानी नेरळ ते पोहीगाव रस्त्याचे कॉंक्रिटीकरण या तीन प्रमुख रस्त्यांचा समावेश आहे. या कामांच्या पूर्णत्वामुळे नेरळ शहरातील वाहतूक कोंडी कायमची संपुष्टात येणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी बोलताना"कर्जतचा शाश्वत विकास हाच आमचा ध्यास आहे. पर्यटन दृष्टीने वाढणारे इन्फ्रास्ट्रक्चर, स्थानिकांना रोजगाराच्या संधी आणि नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. ज्यांना काही काम शिल्लक नाही ते केवळ टीका करण्यात वेळ घालवत आहेत, पण आम्ही मात्र जनतेच्या विकासासाठी सातत्याने काम करत आहोत."

तसेच नेरळ रेल्वे गेट परिसरातील वाहतूक कोंडीचा कायमस्वरूपी तोडगा म्हणून येथे उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन सुरू असून, त्यासाठी आवश्यक निधी लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल, असे सांगण्यात आले. नेरळ बसस्थानकावर प्रवाशांसाठी ई-टॉयलेट सुविधा उभारण्याचे नियोजन देखील करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या भूमिपूजन सोहळ्यात माजी पंचायत समिती सभापती तथा युवासेना तालुका प्रमुख अमर मिसाळ व कोल्हारे सरपंच महेश विरले यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेशदादा टोकरे, तालुकाप्रमुख सुदामदादा पवाळी, युवासेना जिल्हा प्रमुख प्रसाद दादा थोरवे, तालुका संघटक शिवराम बदे, उपतालुकाप्रमुख शरद ठाणगे, उपतालुकाप्रमुख भरतजी डोंगरे, विभाग प्रमुख रत्नाकर बडेकर, विलासदादा हजारे, द्यानेश्वर दादा भगत, उपसरपंच सौ. सविता कोळंबे, सौ. ज्योत्स्ना महेश विरले, सदस्य श्री. रोशन म्हसकर, सौ. अस्मिता विरले, सौ. साक्षी विरले, सौ. नूतन पेरणे, सौ. गीता गणेश मोरे, श्री. उत्तम शेळके, उपतालुकाप्रमुख अंकुश दाभणे, श्री. मयूर पेरणे, श्री. सोमनाथ विरले, श्री. जयवंत साळुंखे, श्री. कैलास विरले, श्री. नरेश कालेकर, श्री. परेश कोळंबे, श्री. प्रशांत झांजे, शाखाप्रमुख श्री. महेश हजारे, श्री. भावेश बोंबे, श्री. दीपक घाटे, श्री. सोपान ठाणगे, श्री. नितीन आहीर श्री मनोहर ठाणगे श्री नारायण पिरकर श्री नरेंद्र गोमारे तसेच असंख्य शिवसैनिक, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित नागरिकांनी या विकास कामांबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, "आता नेरळ शहरातील रस्ते खड्डेमुक्त होतील आणि वाहतूक सुरळीतपणे चालेल," असा विश्वास व्यक्त केला.

# विंचूरमध्ये 'माणुसकीची भिंत' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### गरजूंना आधार देत समाजातील माणुसकीचा सुगंध पसरविण्याचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर**

समस्त विंचूरकर ग्रामस्थांच्या सहकार्याने 'माणुसकी फाऊंडेशन, विंचूर' तर्फे "माणुसकीची भिंत" हा उपक्रम १२ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. "नको असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा" या सुंदर संदेशातून समाजातील परस्पर मदतीची भावना दृढ करण्याचा हा प्रयत्न आहे.

या उपक्रमाअंतर्गत विंचूर बसस्थानकाजवळ, निफाड रोड येथे कपडे, ब्लँकेट्स, शालेय उपयोगी वस्तू, सायकल, खेळणी इत्यादी उपयुक्त वस्तू गोळा करून गरजूंना देण्यात येत आहेत. "चला, गरजूंची दिवाळी गोड करूया" हा या उपक्रमामागील हेतू आहे.

माणुसकी फाऊंडेशनचे कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिक मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभागी होत आहेत. अनेकांनी स्वेच्छेने जुने पण वापरण्यास योग्य कपडे, पुस्तके, चप्पल, व दैनंदिन गरजेच्या वस्तू भिंतीवर ठेवून दिल्या आहेत. तसेच काही व्यापाऱ्यांनी नवीन वस्तू दान करून या सामाजिक




कार्यात हातभार लावला आहे.

या उपक्रमासाठी प्रमुख संयोजक म्हणून राजू मोरे (मो. 9960416002), विनोद शिरसाठ (मो. 9850424541), विकी काळे (मो. 8928654257), किरण शिरसाठ (मो. 8657121912), आणि विनायक मोरे (मो. 8208686252) हे कार्यरत आहेत.

संपर्क समितीमध्ये पांडुरंग राऊत, डॉ. शैलेश काळे, राहुल कर्पे, सुफियान शेख, प्रितम निकाळे, , दिलीप सोनवणे, संजय जाधव, निलेश सालकाडे, किशोर नेवगे, हर्षल जाधव, शंकरलाल सोनी, इम्रान मोमिन, मनोज शिरसाठ यांसह अनेक समाजसेवकांचे योगदान आहे.

माणुसकी फाऊंडेशन, विंचूर यांचा हा उपक्रम दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एक आदर्श सामाजिक चळवळ ठरत असून "देताना आनंद, घेताना सन्मान" हा मानवतेचा संदेश प्रत्येक विंचूरकरापर्यंत पोहोचवत आहे.

याचे ठिकाण विंचूर बसस्थानकाजवळ, निफाड रोड, विंचूर, ता. निफाड

कालावधी: १२ ते १७ ऑक्टोबर २०२५ एवढा आहे.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत पनवेल मध्ये फुलपाखरू उद्यानाचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रोटरीचे माजी प्रांतपाल पनवेल मधील जेष्ठ डॉक्टर गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शना खाली पनवेल महानगर पालिका व रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल च्या सहयोगाने पनवेकरांच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा "फुलपाखरू उद्याना" च्या रूपाने येऊ पहात आहे आणि त्याचा भूमिपूजन समारंभ रविवार 12 ऑक्टोबर रोजी भूखंड क्र .478 व 482, महानगरपालिका गार्डन साईनगर रोड, पनवेल येथे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विस्टा फूड चे संचालक भुपिंदर सिंग यांनी त्यांच्या सीएसआर फंडातून 10 लाखाची देणगी जाहीर केली. या प्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार बाळाराम पाटील, विस्टा फूड चे संचालक भुपिंदर सिंग, विस्टा फूड चे सल्लागार चंद्रशेखर सोमण, पनवेल महानगर पालिका अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये , उपायुक्त विधाते, उपायुक्ता रुपाली माने, रोटरी प्रांत 3131 चे प्रांतपाल रो. संतोष मराठे, पुढील वर्षाचे प्रांतपाल रो. नितीन ढमाले, नियोजित प्रांतपाल रो. चारू श्रोत्री, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, माजी महापौर डॉ. कविता चौतमल, माजी नगराध्यक्षा चारुशीला घरत, बबनदादा पाटील, वाय टी देशमुख, रामदास शेवाळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगर सेवक गणेश कडू, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, डॉ. अरुण भगत,जयंत पगडे, रुचिता समेळ लोंढे, सौ.डॉ.सुरेखा मोहोकर, सौ,प्रीती जॉर्ज, सौ. सारिका भगत, सौ. दर्शना भोईर, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट चे सदस्य या फुलपाखरू उद्यानाचे सल्लागार श्री. दिवाकर ठोंबरे, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे अध्यक्ष अनिल ठकेकर, सचिव अतिश थोरात, प्रोजेक्ट चेअरमन ऋषिकेश बुवा यांचे सह सर्व रोटरी सदस्य, एन्स व साई नगर पारिसरातील जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# बोर्ली पंचतन येथील श्री गणपती मंदिर लोकार्पण सोहळा भक्तीभावाने संपन्न

## बोर्ली पंचक्रोशीत सर्व समाज एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहतात, ही एक आदर्श समाजाच्या दृष्टीने प्रशंसनीय बाब- खा. सुनिल तटकरे

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन: संतोष रेळेकर**

तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील श्री गणपती देवस्थान संस्था व श्री चिंचबादेवी देवस्थान ट्रस्ट, गणेश मित्र मंडळ व महिला मंडळ बोर्ली पंचतन यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणपती मंदिर लोकार्पण सोहळा रविवार दि. १२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्याहस्ते प्रसन्न वातावरणात पार पडला. यावेळी खासदार सुनिल तटकरे यांनी श्री गणरायाच्या चरणी नतमस्तक होत, सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

ह्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना, खासदार सुनिल तटकरे म्हणाले, “आजचा दिवस आपल्या सगळ्यांसाठी भाग्याचा दिवस आहे. ह्या उत्सवाच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, इथे भविष्यात अनेक समाजपयोगी उपक्रम आपण राबवू शकतो. बोर्ली पंचक्रोशीत सर्व समाज एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहतात, ही एक आदर्श समाजाच्या दृष्टीने प्रशंसनीय बाब आहे. ह्या भागातील अनेक प्रकल्प, रस्ते व रखडलेल्या कामे आपण मार्गी लावलेली आहेत, जी बाकी असतील तीसुद्धा येत्या काळात पूर्णत्वास घेऊन जाऊ. हे मी माझे भाग्य समजतो की, लोकप्रतिनिधी म्हणून ज्या कामाचे मी भूमिपूजन केले, त्या कामाचे लोकार्पणदेखील आज माझ्या हस्ते होत आहे.




ते पुढे म्हणाले, श्रीवर्धन तालुक्यातील गावागावांत वेगवेगळ्या ग्रामदैवतांची मंदिरे आहेत. बोर्लीमध्ये सर्व समाजाचे नागरिक राहतात, व्यवसाय करतात आणि एकत्रित राहतात. या परिसरात अनेक प्रकल्प, रस्ते व रखडलेल्या कामांचा आपण पहिला टप्पा, दुसरा टप्पा असे काम करत आलो. लोकशाही पद्धतीने लोकांनी ज्या कामासाठी आपल्याला काम करायची संधी दिली ते मी करत आहे. कोणी कितीही टिका केली, तरीही त्याचा माझ्यावर परिणाम होत नाही. आम्ही काम करत आलोय आणि करत राहू. या ठिकाणी उपस्थितीत तमाम गणेश भक्तांचे आभार मानतो. गणरायाचे चरणी आपल्या सर्वांच्या सुख समृद्धीसाठी प्रार्थना करतो.

या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रवादीचे श्रीवर्धन मतदारसंघ अध्यक्ष महंमद मेमन, गणपती देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष सुशील पाटील, श्री चिंचबादेवी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष सुजित पाटील, लालाभाई जोशी, उदय बापट, रवींद्र कुलकर्णी, सिद्धेश कोसबे, गणेश पाटील, निवास गाणेकर, शंकर गाणेकर, मंदार तोडणकर, संतोष गायकर, यांच्यासह गणेशभक्त, स्थानिक ग्रामस्थ व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दरम्यान बोर्ली पंचतन येथील अखंड बुरुड समाज मंदिराच्या नुतन वास्तुचे उद्घाटन देखील खासदार सुनील तटकरे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी खा. तटकरे म्हणाले, उत्तम पद्धतीने हे सभागृह बांधण्यात आले आहे. मला आणि अदितीला तुमची सेवा करायची संधी मिळाली त्यासाठी तुमचे आभार मानतो. समाज सभागृहाचा उपयोग चालता बोलता असला पाहिजे. आपली घरची वस्तू आहे असा समजायला पाहिजे. दररोज इथे काही न काही कार्यक्रम होणे आवश्यक आहे. मोठ्या संख्येने या परिसरात पर्यटक येत असतात. श्रीवर्धनचा किनारा देखील ब्लू फ्लॅग मध्ये आला आहे. याचा अर्थ आता आंतरराष्ट्रीय पर्यटक देखील इथे येथील. इथल्या महिलांसाठी रोजगार निर्माण होईल.

# धर्माबादेत नगरपरिषद उमेदवारीवर ताणलेलं दोर

## एकीकडे वर्षानुवर्षे पक्षाशी निष्ठावंत, तर दुसरीकडे आयाराम-गयाराम

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :गिरमाजी सूर्यकार**

धर्माबाद नगर परिषदेची वार्ड निहाय उमेदवारी घोषित होताच निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून उमेदवारी वाटपात पुन्हा एकदा “आयाराम-गयाराम” यांचा वरचष्मा दिसून येणार असल्याचे स्पष्ट चित्र आहे. पक्षासाठी वर्षानुवर्षे राबणारे, पक्षाशी एकनिष्ठ राहणारे, संकट काळात सुद्धा साथ न सोडणारे सोडणारे, प्रत्येक आंदोलनात पुढे असणारे, अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जाईल का किंवा त्यांना निष्ठावंताचे फळ मिळेल हे बघणे महत्त्वाचे ठरेल.




स्थानिक पातळीवर अनेकांनी अपेक्षा धरल्या होत्या की, यंदा पक्ष निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देईल. परंतु नेहमीप्रमाणे ऐनवेळी पक्ष प्रवेश करून तसेच वरच्या गोटातील समीकरणे आणि गटबाजी यांचा प्रभाव उमेदवारीवर पडल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून “निष्ठा दाखवणाऱ्यांना फक्त सतरंज्या आणि खुर्च्या उचलण्याचे काम उरले” अशा शब्दांत नाराज कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या. धर्माबादेतील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत असून “निष्ठा विरुद्ध आयाराम” अशी चर्चा गल्लीबोळात रंगू लागली आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी काहींनी शेवटच्या क्षणी पक्षप्रवेश केला, तर काही जुने कार्यकर्ते फक्त झेंडे, खुर्च्या आणि सतरंज उचलण्यात व्यस्त राहिले, अशी स्थानिकांमध्ये उपहासाची चर्चा सुरू आहे.

दरम्यान, काही पक्ष पदाधिकाऱ्यांनी मात्र स्पष्टीकरण देताना सांगितले की, पक्षश्रेष्ठींचा निर्णय अंतिम असून सर्वांना एकत्र घेऊनच ही निवडणूक लढवली जाईल. परंतु तळागाळातील कार्यकर्त्यांचा उत्साह मात्र कमी झाल्याचे दिसून येत आहे.राजकीय पातळीवर या उमेदवारीनंतर धर्माबाद नगरपरिषदेतील सत्तेचे गणित कसे बदलते, हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

धर्माबादमध्ये पुन्हा एकदा राजकारणाने आपला रंग दाखवला असून अचानक प्रवेश केलेल्या आयारामांना उमेदवारी मिळेल की , पक्षाची झेंडे उचलणारे, सभा भरवणारे, गल्ली गल्ली फिरणारे निष्ठावंत कार्यकर्ते — यांना पुन्हा सतरंज्या आणि खुर्च्या उचलायचंच काम राहील काय? अशी चर्चा रंगली आहे.

# उरण इंदिरा गांधी रुग्णालय ते बोरीपाखाडीजोड रस्ता दुरुस्त करावा: पुजा चव्हाण



**दैनिक युवकआधार**
**उरणशहर प्रतिनिधी सायली साळूंके**

दैनंदिन दोन माध्यमिक-उच्चमध्यामि विद्यालयांतील सुमारे दीड तेदोन हजार विद्यार्थ्यांची वर्दळ त्यांना नेंआण करणाऱ्या वहानांची रहदारी,आणि भरीसभर म्हणून याच रस्त्यावर असणारे सरकारी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व यामध्ये उपचारासाठी येणारे रुग्ण त्यांना घेऊन येणारी वहाने रुग्णवाहिका यांची रहदारी मोठया प्रमाणात असताना, उरण नगरपरिषद येथील रस्त्याची झालेली दुरावस्था पहात असतानाही अत्यंत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वांनाच आणि बोरी गावांतील रहिवास्यांना त्याचा मनस्ताप सहनकरावा लागतोअनेक वेळा या बाबत तक्रारी करूनही या मार्गाकडे दुर्लक्ष केले जात असल्याने अखेर यामार्गाची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी यासाठी पत्रकार उत्कर्ष समितीच्या उरण तालुका अध्यक्षा पूजा चव्हाण यांनी एका लेखी निवेदना व्दारे उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या कडे केली केली आहे.

या रस्त्यालाच लागून काही अंतरावर दोन मोठी नामांकित दोन माध्यमिक-उच्चमध्यामि विद्यालय आहेत. या विद्यालयात नेहमी हजारो विद्यार्थी येतात असतात. या सर्वांना या रस्त्यावर चलताना खुप त्रास सहन करावा लागत आहे.तसेच या रस्त्याच्या दुरावस्था मुळे येथेअनेक वेळा अपघात देखील झालेले आहेत.तसेच या रस्त्याच्या बाजूने एकमोठा नाला असून या नाल्याला कोणत्याही प्रकारचा संरक्षक कठाडा बांधण्यात आलेला नसल्याने एखादे वाहन तोल गेल्यास नाल्यात पडण्याची शक्यता आहे त्या मुळे या नाल्याला त्वरित संरक्षक कठाडा बघण्यात यावा.

रस्त्याच्या दुरस्तेमुळे या लहान मुलांना व त्यंच्या सोबत येणाऱ्या पालकांना आपलाजीव मुठीत घेऊन या रत्यावरून प्रवास करावा लागत आहे. अशा स्थितीत या ठिकाणी भविष्यात एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.त्यामुळे या रस्त्यावर कोणतीही दुर्दैवी अपघाती घटना घडल्यास याची सर्व जबाबदारी या संबंधित प्रशासनाची राहील. तरी या गंभीरबाबी कडे उरण नगरपरिषद प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्वरित करावे अशी मागणी “पत्रकार उत्कर्ष समितीच्या” उरण तालुका अध्यक्षा पूजा चव्हाण यांनी एका लेखी निवेदनाव्दारे केली असून सदरचे निवेदन नगरपरिषदेचे मुख्यधिकारी यांना दिले आहे.



आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पुढील महिन्यात जाणारा पॉवरलिफ्टिंग रायगडचा खेळाडू "गणेश पुष्पा संजय तोटे",याचा सत्कार माननीय उपमुख्यमंत्री क्रीडा प्रेमी अजितदादा पवार यांच्या हस्ते आज रविवार दिनांक १२/१०/२०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता पुणे कोथरूड येथे झाला. श्री गणेश तोटे याचे हार्दिक अभिनंदन आणि स्पर्धेसाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

शुभेच्छुक
पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड चे सर्व पदाधिकारी
( दैनिक युवक आधार )

# विंचूरमध्ये दिवसाढवळ्या चोरी

## बँकेतून काढलेले १ लाख ९० हजार रुपये डिकीतून लंपास

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर प्रतिनिधी**

शहर परिसरात पुन्हा एकदा दिवसाढवळ्या चोरीची धक्कादायक घटना घडली आहे. ॲक्सिस बँकेच्या लासलगाव शाखेतून एक लाख ९० हजार रुपये काढून मोटारसायकलच्या डिकीत ठेवलेले पैसे अज्ञात चोरट्याने पळविल्याची घटना ९ ऑक्टोबर रोजी विंचूर येथे घडली. या प्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीही लासलगाव व परिसरामध्ये अशा अनेक घटना घडल्या असून अद्याप पर्यंत एकही घटनेचा सुगावा न लागल्याने पोलिसांच्या तपासावर चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कचरू वामन चतुर (रा. मीठसागरे ता सिन्नर ) यांनी ॲक्सिस बँकेत एक वर्षासाठी ठेवलेली मुदत ठेव काढली. त्यांनी बँकेतून रक्कम काढून ती आपल्या मोटारसायकल (एम.एच.१५-जीवाय-७०३३) च्या डिकीत ठेवली. त्यानंतर ते विंचूर येथील जगदंबा ऑटोमोबाईल्स दुकानासमोर मोटारसायकल उभी करून थोड्या वेळासाठी दुकानात गेले. दरम्यान, अज्ञात चोरट्याने संधी साधत मोटारसायकलच्या डिकीत ठेवलेली १ लाख ९० हजार रुपयांची रोकड आणि पावत्या लंपास केल्या. चोरट्याने अत्यंत नियोजनपूर्वक ही चोरी केल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट झाले आहे.

चोरट्याचा शोध घेण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बँकेतून मोठी रक्कम काढणाऱ्या ग्राहकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



# नव्या शिक्षण धोरणातली शिक्षणाची फळे तथा वाघिणीचे दूध सर्वांना द्या !,चर्चासत्रात वक्त्यांचा सूर !






**दैनिक युवक आधार**
**खारघर वार्ताहर**

**खारघर,** नवी मुंबई येथे सत्याग्रह महाविद्यालयाचा १६ वा स्थापना दिन तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.के. डोंगरगावकर यांच्या जन्मदिनाच्या अभिनंदन दिनानिमित्त "संविधानिक दृष्टिकोनाचा नवीन शिक्षण धोरणात प्रभाव, प्रतिबिंब आणि प्रासंगिकता" या विषयावर चर्चासत्र रत्नमाला डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

चर्चासत्राचे प्रास्ताविक सत्याग्रह शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्या नेहा राणे यांनी केले. त्यांनी भारतीय संविधानाला अपेक्षित असलेला भारतीय नागरिक आणि त्याच्या जडणघडणीसाठीची शैक्षणिक उद्दिष्ट्ये, धोरणे आणि सरकारची भूमिका यावर सखोल माहिती दिली. संविधानाची उद्देशिका ही सर्व भारतीयांनी पाळण्याची जबाबदारी भारताच्या नागरिक म्हणून सर्वांवर बंधनकारक आहे. त्याला शिक्षण व्यवस्था आणि ती चालवणारी यंत्रणा अपवाद नाही, या सर्व बाबतीत चिकित्सा व्हावी, संस्थेच्या सर्व स्तरावरील शिक्षक आणि इतर घटकांना नवीन शिक्षण धोरण आणि त्याचे पैलू ज्ञात व्हावेत म्हणून या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असल्याचे राणे यांनी सांगितले.

सुजाता भोसले, एम.एल. सूर्यवंशी, नेहा कपोते, डॉ. प्रीती शर्मा, प्राचार्या वनिता सूर्यवंशी, आशा शिंदे, अमरचंद हाडोळतीकर, प्रमिला सणस यांनी नवीन शिक्षण धोरण आणि त्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. भारतीय समाजातील बहुसंख्य आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना नव्या शिक्षण धोरणातून सम्यक, दर्जेदार, रोजगाराभिमुख, कालसुसंगत, बहुकौशल्य आणि इंग्रजी भाषेतील शिक्षण मिळणे दुरापास्त झाले आहे. नव्या शिक्षण धोरणाने निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी शासनाने जबाबदारी घेतली पाहिजे, असा सूर या वक्त्यांनी मांडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समग्र सत्याग्रह हा सामान संधी आणि दर्जासाठी आहे, म्हणून सत्याग्रह नावाने सुरू असलेल्या महाविद्यालयाने नव्या शिक्षण धोरणात सामान संधी आणि दर्ज्यापासून वंचितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात येणारे धोरण वंचितांना न्याय देण्यास साहाय्यभूत ठरत असल्याचे प्राचार्या वनिता सूर्यवंशी यांनी सांगितले.

शिक्षण व्यवस्था भांडवलदारांच्या हातातले खेळणे झाले आहे. नव्या शिक्षण धोरणाचा लाभ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यापेक्षा पालकांना कर्जबाजारी करीत आहे. सरकार उद्योगपतींना अनेक सवलती देत आहे, मात्र शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या धर्मादाय संस्थांना छंद देत नाही, त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना नवीन शिक्षण धोरणाच्या संधींपासून वंचित राहणे भाग पडत आहे. आर्थिकदृष्ट्या संपन्न आणि विकसित राष्ट्रांच्या समांतर उत्पन्न असलेल्या पालकांसाठी नवीन शिक्षण धोरण अत्यंत लाभदायक झाले आहे. भविष्यात यामुळे राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण होऊ शकतो म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषेत उच्च दर्जाचे शिक्षण म्हणून नव्या शिक्षण धोरणाचा जय जय कर होत असताना हे वाघिणीचे दूध समाजातील सर्व घटकांना पिण्याची सोया करावी असे वक्त्यांचा एकमुखी सूर होता !

ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जी.के. डोंगरगावकर यांनी नव्या शिक्षण धोरणाच्या संधी आणि आव्हानांबाबत तपशीलवार मांडणी केली. संविधानिक मूल्यांशी विसंगत असलेले धार्मिक शिक्षण भारताच्या एकतेस आव्हान आहे, तर नव्या शिक्षण धोरणाने धार्मिक अल्पसंख्यांक तसेच सामान्य उच्चशिक्षण संस्थांना धर्मशिक्षणाचा बाजार करण्याची संधी प्राप्त झाली आहे. जगाला सक्षम आणि जगातील उद्योग-व्यवसाय, आरोग्य, तंत्रज्ञान, शांतता, अवकाश, पर्यटन, शेती प्रशिक्षण, पशुपालन, मानवी सेवा आणि भांडवल क्षेत्रात आवश्यक असलेले निर्यातक्षम आणि कृत्रिम बुद्धिमतेला समांतर उच्चदर्जाचे मनुष्यबळ निर्मिती आणि प्रशिक्षण अल्पजणांना नव्हे तर बहुजनांना बहुराष्ट्रीय विश्वनिर्माता म्हणून कार्य करणारी शिक्षणव्यवस्था अपेक्षित असताना नव्या शिक्षण धोरणात उद्दिष्ट आहे, पण जबाबदारी सरकारची नसून खाजगी शिक्षण संस्था चालकांची झाली असून शिक्षण संस्था चालकांचा दृष्टिकोन भांडवलवादी आहे. संविधानिक बांधिलकी आणि संविधानिक नीतिमत्ता त्यांच्यावर सोपवणे ही राजकारण्यांनी केलेली संविधानाची प्रतारणा असून संविधानाला अपेक्षित उपेक्षित वर्गाला सुविधा, सवलती, शिष्यवृत्ती आणि सन्मान देऊन समर्पित भावनेने आम्ही भारतीय म्हणून समावेशी शिक्षण धोरणानुसार कृती आवश्यक आहे.

नवीन शिक्षण धोरण २०२० हे वरकरणी आधुनिक दिसत असले तरी या धोरणाच्या अंमलबजावणीतून प्रतिगामी, भांडवलवादी, ब्राह्मणी व्यवस्थेचे हितचिंतक आणि असमान व्यवस्थेचा बाजाराला आणि वर्चस्वाला पुन्हा जिवंत करणारे ठरेल, म्हणून जागतिकीकरणाशी पूरक पुनर्रचना होत असताना या धोरणाच्या संविधानिक विसंगत परिणामांबाबत सावधानता संविधानिक यंत्रणेने घेण्याची आवश्यकता असल्याचे डोंगरगावकर यांनी सांगितले. भारताला स्वातंत्र्य असमानतेसाठी नसून समतेसाठी आणि सामान संधी, सामान दर्जा आणि प्रत्येक नागरिकांच्या सन्मानाची प्रतिष्ठेची संविधानिक हमी आहे, म्हणून नव्या शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करताना शिक्षकांनी शाळा आणि शाळाबाह्य संविधानिक संदेशाचे वाहक व्हावे, असे डोंगरगावकर यांनी म्हटले.

डॉ. अभिजित ओहाळ, दै. पुण्यनगरीचे वरिष्ठ उपसंपादक, या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्यांनी संस्थेच्या उपक्रमाची वर्णन करताना म्हणाले संस्थेच्या संविधानपूरक उपक्रमांबरोबरच उपेक्षितांबरोबर सक्षमांचे शिक्षण एकाच शिक्षण संकुलात संस्कार करणारी प्रयोगशाळा म्हणून उल्लेख करणे हे खऱ्या अर्थाने या संस्थेचे मूल्यमापन आहे, असे डॉ. अभिजित ओहाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्राच्या अध्यक्ष्या रत्नमाला डोंगरगावकर यांनी संस्थेची उभारणी जडणघडण आणि गेल्या ४ दशकाचा संक्षिप्त आढावा आणि संस्थेच्या ध्येय धोरणाची नांदणी केली. सिद्धार्थ, अजिंठा, मंडेला, सुपारीक, सत्याग्रह ही नवी शैक्षणिक केंद्रे सुरू करण्यामागचा संस्था व्यवस्थापनाचा दृष्टीकोन हा भारतीय शिक्षण संस्कृतीची परंपरा आणि वारसा जपण्याचे प्रतीक आहे, असे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी सामान संधीचा पुरस्कार करणारे सत्याग्रह महाविद्यालय आहे, असे त्या म्हणाल्या.

पुढे त्या म्हणाल्या "समाजातील कोणताही घटक सामान संधीपासून वंचित राहू नये म्हणून संस्थेच्या वतीने शाळा-महाविद्यालयांच्या १० किमी परिघातील अनाथ, अपंग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, प्रादेशिक आणि भाषिक कारणांमुळे शैक्षणिक सवलतींपासून वंचित, दर्याखोऱ्यातील व ग्रामीण भागातील शिक्षण सुविधाविना राहिलेल्या आदिवासी, मुंबई महानगरातील झोपडपट्टी वस्तीतील मुलांचा शैक्षणिक सर्वेक्षण आणि शाळाबाह्य मुलांना प्रवेश मार्गदर्शन, भारत आणि महाराष्ट्र सरकारच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती-फ्रीशिप योजनांची तंतोतंत अंमलबजावणी, ३०% मुलींच्या आरक्षण धोरणाचा अंमल, तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणीमुळे शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित असलेल्या मुलांना शिक्षणशुल्कात सवलत, तसेच "कमवा आणि शिका" योजना, संविधान साक्षरता, कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्य साक्षरता, सामाजिक न्याय आणि महिला कायदा साक्षरता, संस्कृत-पाली भाषा ओळख आणि संभाषण वर्ग, अभ्यासात कच्चा असलेल्या मुलांसाठी विशेष वर्ग असे अनेक उपक्रम आणि योजना आखून सर्वांना शिक्षणाची संधी व उच्च दर्जाचे सम्यक शिक्षण देऊन जागतिकीकरणाची आव्हाने पेलणारे आणि भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी उपेक्षितांच्या वाटा निर्माण करणारे आणि राष्ट्राच्या जडणघडणीबरोबरच सामाजिक एकता आणि समतेचा संग्राम शिक्षणाच्या माध्यमातून संस्था गेली ४ दशकांपासून संविधानिक दृष्टिकोनाला पूरक काम करत आहेत

संस्थेत अनेक उच्चदर्जाचे आणि प्रशिक्षित शिक्षक सेवाभावी आणि सामाजिक बांधिलकीतून काम करतात. संविधानाचे ॲम्बेसेडर म्हणून या संस्थेचा प्रत्येक घटक कटिबद्ध आणि निष्ठेने शैक्षणिक कार्य करीत आहेत" या कार्यक्रमाला संस्था संलग्न शाळा , महाविद्यालयातील १५० शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारीवर्ग उपस्थित होता . गेल्या २५ वर्षात सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून घडवलेल्या आणि जीवनाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी इमारत बांधकामासाठी स्वइच्छेने, क्षमतेप्रमाणे बांधकाम साहित्यअथवा श्रमदान अथवा यथावकाश शक्य तेवढा आर्थिक दान करण्याचे आवाहन ॲड. राजरत्न डोंगरगावकर यांनी आव्हान केले . शिक्षकांनी या साठी सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष माजी विध्यार्थी मेळावा घेऊन सामाजिक न्याय गतिमानातेसाठी प्रेरित करा असे आव्हान केले. सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयाचे कार्यालयीन प्रमुख तुकाराम कांबळे यांनी आभार मानले .राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## १ लाख २० हजार रुपये किमतीचा गांजा अवैद्यपणे विक्री करणाऱ्यां दोन युवकांना पोलिसांनी केले जेरबंद

### स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व खालापूर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (आनंद पवार)**


रायगड जिल्ह्यात अवैद्य धंद्यांना बीमोड करण्यासाठी व त्याला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने कारवाईचा बडगा उचलत अशा अवैद्य धंद्यांना रोखण्यासाठी पोलीस यंत्रणा जिल्ह्यामध्ये सज्ज झाली आहे.रायगड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक लेडी सिंघम श्रीमती आंचल दलाल यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर रायगड जिल्ह्यातील गुन्हेगारी व अवैधरित्या धंदे करणाऱ्यांना चांगली चपराक बसली असुन जिल्ह्यात काही ठिकाणी अवैद्यरित्या धंदा करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर आहे.

दि.८ ऑक्टोंबर २०२५ रोजी अलिबाग रायगड येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहायक फौजदार संदीप पाटील यांना गोपनीय बातमी मिळाली की, दोन इसम स्कुटीवर गांजा विक्री करण्यासाठी मुंबई पुणे जुना हायवे घोडीवली फाटा येथे एका बंद पेट्रोल पंपामध्ये येत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यावर सदरची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक श्री मिलिंद खोपडे यांना देऊन ,खालापूर पोलीस निरीक्षक श्री सचिन पवार यांची मदत घेऊन स्टाफसह पोलीसांनी त्या ठिकाणी सापळा रचला.याच दरम्यान दोघेजण स्कुटी घेऊन आल्यानंतर पोलिसांना त्यांच्यावर संशय बळावला पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता व गाडीची तपासणी केली असता त्यांच्या ताब्यातील स्कुटीमध्ये ३.३८३ किलोग्रॅम वजनाचा १,२०,०००/-रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला तसेच आरोपीत यांनी वापरलेल्या २,००,०००/-किमतीच्या दोन्ही स्कुटी जप्त करण्यात आले आहेत विवेक विश्वनाथ गायकवाड वय (२२) राहणार शेडवली तालुका खालापूर व सुदर्शन वसंत सावंत वय (३२) राहणार यशवंत नगर खोपोली ह्या दोघांना ताब्यात घेतले असून यांच्यावर ३४०/२०२५ एनडीपीएस अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२०(ब) ii २९ अन्वये नोंद करण्यात असून त्यांना १३ ऑक्टोंबर पर्यंत पोलीस कस्टडी देण्यात आली. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक अंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.विशाल मेहुल, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे, मोहन बहाडकर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे सहाय्यक फौजदार संदीप पाटील, मोहन भालेराव, पोलीस हवलदार बाळा जाधव, विशाल शिंदे,देवेंद्र शिनगारे, शेखर मोरे चालक संदेश कावजी हे तपास करीत आहेत

## निफाड जवळील भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड :** छत्रपती संभाजीनगर–नाशिक महामार्गावर निफाड जवळील कादवा नदी पुलावर झालेल्या भीषण अपघातात बुलेटवरून प्रवास करणाऱ्या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. निफाड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निफाड येथील सुनीता जनरल स्टोअर्सचे मालक सचिन दुधेडिया (जैन) यांचा मुलगा प्रियांशु सचिन दुधेडिया (जैन, वय २४) हा शनिवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास बुलेट थंडर (क्र. एमएच १५ एसएस ३५४४) ने निफाडहून नाशिकच्या दिशेने जात होता.दरम्यान, कादवा



नदी पुलावर पोहोचताच मारुती सुजुकी सुपर कॅरी (क्र. एमएच ४६ बीएम ०५७१) या वाहनाने त्याच्या बुलेटला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत प्रियांशु रस्त्यावर कोसळून त्याच्या डोक्याला व चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने उपचारासाठी दवाखान्यात हलविण्यात आले, परंतु दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित कारचालक पसार झाला असून सिद्धेश प्रशांत दुधेडिया यांच्या फिर्यादीवरून निफाड पोलीस ठाण्यात 'फेटल' अपघाताची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.प्रियांशु हा मनमिळावू, सामाजिक कार्यात रस घेणारा व मित्रपरिवारात लोकप्रिय तरुण होता. त्याच्या अकाली निधनाने निफाड शहरावर शोककळा पसरली आहे. अत्यंत भावपूर्ण वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पश्चात आजी, वडील, आई, भाऊ, काकू, चुलते, चुलत भाऊ आणि बहीण असा परिवार आहे.

## साफयिस्ट कंपनीच्या कामगारांवरील अन्यायाबाबत लवकरच मुख्यमंत्री, भाजप प्रदेशाध्यक्षांची भेट घेणार!: भाजप नेते प्रशांत यादव

### स्थानिक कामगारांवर अन्याय होऊ देणार नाही : कामगारांच्या उपोषणासही पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार चिपळूण**

गाणे खडपोली येथील साफयिस्ट कंपनीत कार्यरत असलेल्या कामगारांवर कंपनी व्यवस्थापनाकडून केलेल्या अन्यायकारक कारवाईबाबत लवकरच मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्रजी चव्हाण साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याची माहिती भाजप नेते प्रशांत यादव यांनी दिली. कंपनीकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात कामगारांनी १४ ऑक्टोबर रोजी बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे. या उपोषणासही आमचा पाठिंबा राहील, असे श्री. यादव यांनी सांगितले.

प्रशांत यादव म्हणाले, की सुमारे २५ वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या कामगारांना कामावरून कमी केले आहे.



दि. 26 सप्टेंबर 2025 रोजी कंपनी व्यवस्थापनाने तडकाफडकी कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता सदरच्या कामगारांना कामावर हजर होण्यास मज्जाव केला. त्यानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत कंपनी व्यवस्थापनाने टप्प्याटप्प्याने संबंधित कामगारांना कामावर हजर करून घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर काही कामगारांना पहिल्या टप्प्यात हजर करून घेण्यात आले. मात्र त्यांनाही कंपनीत अपमानास्पद वागणूग दिली जात आहे. कामगार संघटनेने यासंदर्भात कंपनीकडे तसेच स्थानिक प्रशासनाकडे वारंवार निवेदन दिले असूनही कोणतीही सकारात्मक कारवाई झालेली नाही. परिणामी सुमारे २४० कामगारांवर आणि त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे या कामगारांनी दि. १४.१०.२०२५ पासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे. या उपोषणासही आमचा पाठिंबा राहील.

दीपावलीचा सण तोंडावर असताना या कंपनीत अनेक वर्षे काम केलेल्या सुमारे २४० कामगारांवर कंपनीने अन्याय केला आहे. त्यामुळे त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. सदरचे कामगार खडपोली, गाणे, वालोटी, कळकवणे आणि लगतच्या परिसरातील स्थानिक आहेत. आपल्याच परिसरातील स्थानिकांवर ऐन सणासुदीच्या तोंडावर साफयिस्ट कंपनीकडून अन्याय होत असेल, तर तो सहन केला जाणार नाही. यासंदर्भात आपण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण साहेब यांची भेट घेणार आहोत. सदरच्या कामगारांवरील अन्यायकारक कारवाई रद्द व्हावी आणि या सर्व कामगारांना सन्मानपूर्वक कंपनीत रुजू करून घेण्यात यावे, यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत, असे प्रशांत यादव यांनी सांगितले.

## शिक्षणाधिकाऱ्यांची कुंडी येथील शाळेला भेट

**दैनिक युवक आधार**
**शिवाजी पवार सेलू तालुका**
**जिल्हा परभणी**

मुख्यमंत्री ग्राम समृद्धी अंतर्गत आढावा भेटीसाठी कुंडी येथे आले असताना परभणीचे प्राथमिक शिक्षणाधिकारी मा.श्री.सुनील पोलास साहेब व उपशिक्षणाधिकारी मा.श्री. गजानन वाघमारे साहेब यांनी कुंडी येथील जिल्हापरिषद शाळेला भेट दिली.भेटीदरम्यान वर्ग सहावीच्या विद्यार्थ्यांसोबत मा.शिक्षणाधिकारी महोदयांनी मुक्त संवाद साधला. विद्यार्थिनींनी घेतलेल्या मुलाखतीत स्वतःचा अभियंता ते प्राथमिक शिक्षणाधिकारी हा प्रवास यांनी उलगडून सांगितला. तसेच विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी




अभ्यासातील सातत्य,मेहनत,जिद्द व संघर्ष या बाबी अत्यंत आवश्यक आहेत असे मार्गदर्शन केले.तसेच काही प्रशासनिक सूचनाही केल्या. अत्यंत धावत्या भेटीमध्येही शालेय वेळेनंतर मा.शिक्षणाधिकारी व मा. उपशिक्षणाधिकारी यांनी दिलेला पाऊण तास हा विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आणि प्रेरणादायी ठरल्याची भावना शाळेचे मुख्याध्यापक राम गायकवाड सर यांनी बोलून दाखवली. यावेळी शिक्षक श्रीमती मंजुषा कोत्तावार,श्री नागनाथ कलकोटे, श्रीमती महानंदा पांचाळ, श्रीमती सुमिता सबनीस, श्रीमती अनिता यादव,श्री भारत मोगल, श्रीमती अरुणा शिरल्लू आदी उपस्थित होते..!

# "संविधान" महाकाव्यात झळकले लिंगायत अभिनेता उमेश मरडवार

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा :** नुकत्याच झालेल्या पवित्र दिक्षाभुमी नागपुरात "संविधान" महाकाव्य या लाखों अनुयायींमध्ये अतिशय प्रसिद्ध झालेल्या नाट्यात नागपूरचे वीरशैव लिंगायत अभिनेता उमेश मरडवार यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका साकारली. आणि ते रसिकांमध्ये अत्यंत प्रभावशाली ठरली. याबाबद अखिल भारतीय वीरशैव लिंगायत "शिवा" संघटनेचे भंडारा जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे यांनी अभिनेता उमेश मरडवार यांनी ही प्रभावशाली भूमिका साकारली त्याबद्दल समस्त भंडारा गोंदिया जिल्हा वीरशैव लिंगायत शिवा संघटना वतीने अभिनंदन शुभेच्छा दिल्या आहेत.




महाराष्ट्राचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल व मनोरमा एम्प्रेस यांच्या मार्गदर्शनात ( ०२ ऑक्टों.) रोजी दीक्षाभूमीवर सादर झालेल्या 'संविधान' या महाकाव्यात्मक नाटकाने रसिकांना प्रभावित केले. या महानाट्य प्रयोगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कठोर परिश्रमाचे आणि संविधान निर्मितीसाठी केलेल्या जीवन संघर्षाचे ठळक चित्रण होते. दोन तासांचे हे महाकाव्यात्मक नाटक ओबीसी आरक्षणाचा मुद्दा, भारतातील सर्व महिलांना धर्म आणि अंधश्रद्धेच्या बंधनातून मुक्त करून, त्यांना स्वातंत्र्य आणि स्वावलंबन देणारे हिंदू कोड बिलावरील सनातनींविरुद्धचे संघर्ष दर्शविते. या नाटकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लाखो अनुयायांनी वाखाणले. या नाटकाचे दिग्दर्शन नितीन बनसोड, संहिता लेखन अमन कबीर, गीतलेखन प्रकाश राहुले, संगीत संयोजन एस. चतुरसेन आणि सॅम ए. अहका, प्रकाश योजना बाबा पदम यांची होती.

या संविधान महानाट्यात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अतिशय प्रभावशाली भूमिका नागपूरचे तथा मराठी हिंदी चित्रपटातील लिंगायत समाजाचे अभिनेते उमेश मरडवार यांनी साकारली. तर आई रमाईच्या भूमिकेत वैशाली कोचमपल्लीवार हिने साकारली. नागपूरचे वीरशैव लिंगायत अभिनेते उमेश मरडवार यांनी आतापर्यंत मराठी व हिंदी चित्रपटात विविध भूमिका साकारली आहेत. त्यात ( हिंदी ) २६ नोव्हेंबर, बारात, फ्रॉड, मिशन ब्लैक पॅंथर, शॉर्ट फिल्म सीआयडी भूमिकेत तलाश, मराठी चित्रपट बॉडी गार्ड, राम नाम सत्य है, रेशीमगाठी, स्वातंत्र्य अश्या चित्रपटातून विविध भूमिका त्यांनी केल्या. यांसह विविध नाट्य जाणता राजा, गण गण गणात बोते, पहेलवान, सिंधूगिरी, उत्तर रामायण, दूसरे महायुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चार्ली असे विविध चित्रपट व महानाट्यात भूमिका साकारली असून महाराष्ट्र राज्य स्तरीय विविध पुरस्काराने लिंगायत अभिनेता उमेश मरडवार यांना सन्मानित करण्यात आले आहे. सदर अभिनेते उमेश मरडवार यांच्या या प्रभावशाली अभिनयांवर अखिल भारतीय वीरशैव लिंगायत शिवा संघटना महाराष्ट्र भंडारा जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे व नागपूर अध्यक्ष सुकन्या थडकर व समस्त वीरशैव लिंगायत समाजावतीने अभिनेता उमेश मरडवार यांना पुढील यशस्वीतेकरीता हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# भवानीनगर येथे शेतकरी कर्जमुक्ती एल्गार सभेत सरकारवर सडकून टीका

## माजी मंत्री जानकर व कडू यांची आक्रमक भूमिका

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**




इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे रविवार दि 12 ऑक्टोबर रोजी दुपारी शेतकरी कर्जमुक्ती एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी मंत्री आमदार बचू कडू माजी मंत्री महादेव जानकर या मेळाव्यासाठी उपस्थित होते. यावेळी जानकर यांनी शेतकरी अडचणीत आहे त्याला कर्जमाफी करून न्याय देण्यात यावा म्हणून सरकारवर सडकून टीका करण्यात आली. माजी मंत्री बचू कडू यांनी शेतकऱ्यांना मिळणारे बोगस बियाणे हे गुजरात राज्यातून येत असून सद्या गुजरातमध्ये बोगस बियाणेची टक्केवारी एक वर असून महाराष्ट्र राज्यात त्याची आकडेवारी पंधरा टाक्यावर गेली आहे. महाराष्ट्र राज्यात उसाला 4200 रुपये भाव बसत असून राजकारणी लोकांचे कारखाना असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करायला लागत असल्याचे चित्र महाराष्ट्र मध्ये बघायला मिळत आहे.महाराष्ट्र मधील शेतकरी हा वीस टक्के तोट्याने शेती करत आहे हे महाराष्ट्र जनतेच दुर्दैव आहे असं आपल्या भाषणात म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पश्चिम महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे नेते विठ्ठलराव पवार यांनी केले यावेळी पश्चिम महाराष्ट्र युवक प्रदेशाअध्यक्ष अमरसिंह कदम शेतकरी कृती समितीचे सदस्य सतीश काटे देशमुख पुणे जिल्हा दिव्यांग उपाध्यक्ष भारत इंगोले इंदापूर तालुका सचिव रामदास चव्हाण रामभाऊ रायते आदी कार्यकर्ते शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलकरांना नाट्यसंगीत भक्तिसंगीत ऐकण्याची पर्वणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल कल्चरल सेंटर, सूर निरागस हो सांस्कृतिक विकास मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल या तीन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. 26 ऑक्टोबर 2025 रोजी सायंकाळी 5.30 वा. 'नाट्यभक्तिधारा' या दीपोत्सवी मैफलीचं आयोजन केले आहे.

यात ओमकार प्रभुघाटे आणि संपदा माने हे कलाकार नाट्यसंगीत आणि भक्तीसंगीत सादर करतील. त्यांना तबला साथ करतील रामकृष्ण करंबेळकर, तर संवादिनी साथ करतील वरद सोहनी. याशिवाय पखवाज साथ सूरज गोंधळी आणि तालवाद्य साथ समीर कर्वे करतील. या कार्यक्रमाचं निवेदन करतील दीपक पळसुले. हा कार्यक्रम पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात आयोजिला जात असून तो सर्व रसिकांसाठी खुला (विनाशुल्क) आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : मिलिंद गोखले - 88799 87371 अथवा किरण बापट 8454863342

# राज्यस्तरीय ख्याल गायन स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

युवा पिढीमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताची आवड निर्माण व्हावी, हा समृद्ध वारसा त्यांनी जतन व संवर्धन करावा, या हेतूने गेली 29 वर्षे या संस्थेतर्ड्गे राज्यस्तरीय हिंदुस्तानी शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धा आयोजित केली जात असून यात 16 ते 45 वयोगटातील केवळ हौशी गायक-गायिकांनी 20 मिनिटांच्या कालावधीत ख्याल आणि द्रुत लयीतील बंदिश गावी अशी संस्थेची अपेक्षा आहे. ही स्पर्धा दोन फेऱ्यात होईल. पहिल्या फेरीसाठी स्पर्धकांनी स्वत: हजर रहावयाचे नसून आपल्या गायनाचा व्हिडीओ इ-मेल किंवा व्हॉटस् ॲप किंवा टेलिग्रामच्या माध्यमातून 14 डिसेंबर पूर्वी संस्थेकडे पाठवायचा आहे. पहिल्या फेरीचा निकाल दि. 20 डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येईल. पहिल्या फेरीतून 10 स्पर्धकांची निवड दि. 11 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी करण्यात येईल. स्पर्धेची प्रवेश फी रु. 500 असून ती ऑनलाइन भरता येईल. स्पर्धेचा प्रवेश अर्ज गुगल फॉर्म स्वरुपात भरावा लागेल. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक : रुपये 10,000, द्वितीय रु. 7,000 तर तृतीय रु. 5,000. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी स्पर्धा समिती प्रमुख मधुरा सोहनी 99207 18745 अथवा श्रीधर सप्रे 98333 69123 यांच्याशी संपर्क साधावा

# इंदापूर तालुका अध्यक्षपदी गणेश भोसले यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळ पुणे जिल्हा कार्यकारणी पद नियुक्ती सोहळा नुकताच श्रीक्षेत्र ओझर येथे संपन्न झाला.यामध्ये युवक महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळाच्या इंदापूर तालुका अध्यक्षपदी सणसर येथील युवा उदयोजक गरीब ड्रायक्लीनचे मालक मा.गणेश भोसले यांची नियुक्ती करण्यात आली.सदर नियुक्ती हे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खंडेराव कडलक उपाध्यक्ष संतोष भालेकर उपाध्यक्ष नामदेव वाघमारे तसेच पुणे जिल्हाध्यक्ष विकास अभंग यांच्या हस्ते देण्यात आले.




यावेळी इंदापूर तालुका महिला अध्यक्षपदी पल्लवी भोसले युवक अध्यक्षपदी इंदापूर तालुका गणेश भोसले तंटामुक्ती अध्यक्ष अर्जुन गायकवाड आदिजणांची नवनिर्वाचित निवड करण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने माजी पुणे जिल्हा अध्यक्ष नवनाथ कदम शिरूरचे अध्यक्ष सुभाष दळवी राहुल भोसले सुदाम गायकवाड नवनाथ भोसले अरुण नवले आबासाहेब शिंदे प्रशांत शिंदे महादेव पवार सुहास गायकवाड योगेश गायकवाड तुषार काटकर राहुल आरडे संदीप भोसले नितीन काळे वैभव काळे कुणाल कारंडे पिनू शिंदे मनोज राक्षे उमेश गायकवाड ईश्वर गायकवाड आदिजण या सर्व निवडीसाठी विशेष प्रयत्न यांनी केले होते.

तसेच सणसर येथील युवा उद्योजक गरीब ड्रायक्लीनचे मालक मा.गणेश भोसले यांनी येणाऱ्या काळात इंदापूर तालुक्यातील समाज बांधवांना एकत्र घेऊन आरक्षणाचे, पारंपरिक असणारा व्यवसाय लॉन्ड्री संदर्भातील प्रश्न असतील तसेच परीट समाजा वरती होणारे अत्याचार रोखण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे बोलले आहे त्यांच्या या निवडीनंतर सणसर परिसरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत असून कौतुक केले जात आहे.

## आदर्श शिक्षक

उत्तम कृतींचा नमूना असतो आदर्श शिक्षक,
समाजाचा सच्चा ठरतो तो मार्गदर्शक ।।धृ।।
आदराने स्मरती,कित्येक वर्षे तयास लोक,
ईश्वर कृपेने कृती न घडावी तया हातून विघातक,
कारण अनमोल गुणवत्ता असते तयात नेक।।२।।
काही ठिकाणी अधिकारी द्न्यान ठेवती गहाण,
असूनी सखोल द्न्यान भासवती कोरडेपाषाण,
अशा समयी होते मूल्यमापन होते सामायिक ।।२।।
घडते भ्रष्टाचार तरी गप्प राहती शिक्षक,
आचार संहिता जपतात तयांचे राहून मूक,
एक तर्फीचा लढा ठरतो निष्फल,कला असून अनेक ।।३।।
गुणवत्तेपेक्षा त्रूटीच शोधती परिक्षक,
एकास सहकार्य तर दुसर्यास ठरती मारक,
काय करेल अशा समयी खरा आदर्श शिक्षक ।।४।।

श्री.बाबाजी लक्ष्मण धोत्रे
गणेश नगर दमखाडी ता .रोहा
जि.रायगड
७३८५८८९२४०

# "भात कापणीला सुरुवात; माकडांचा त्रास शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी"

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा प्रतिनिधी - शिरीष समेळ**

म्हसळा तालुक्यात सध्या भात कापणी आणि मळणीचा हंगाम सुरू झाला आहे. निसर्गाच्या कृपेने यंदा पावसाचे समाधानकारक प्रमाण मिळाल्याने भातशेती बहरली होती. हिरव्या शेतात पिकलेल्या सोनसळी लोंबकळणाऱ्या ओंब्याकडे पाहून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते. मेहनतीचे सोने झाले, असा आनंद गावागावात होता. मात्र, या आनंदावर पाण्याचा डोह ओतल्यासारखा प्रकार माकडांच्या प्रचंड त्रासामुळे घडतो आहे.



गेल्या काही आठवड्यांपासून म्हसळा तालुक्यातील अनेक गावांमध्ये माकडांच्या टोळ्यांनी शेतकऱ्यांचे पीक उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली आहे. आगरवाडा वरवटणे, जांभूळ, सकलप,खरसई, मेंदडी या भागांतील शेतकऱ्यांनी या समस्येची तीव्र तक्रार केली आहे. माकडांच्या टोळ्या दिवसभर शेतात वावरत राहतात. काही ठिकाणी त्यांनी भाताच्या लोंब्याचे नुकसान केले आहे, तर काही ठिकाणी मळणी केलेल्या भातावर धाड टाकून भात सांडवले आहे.

शेतकरी सांगतात की, "एकीकडे पावसामुळे काही ठिकाणी भात आर्द्र झाला, आणि दुसरीकडे माकडांच्या टोळ्यांनी जे उरलं तेही संपवलं. मेहनतीवर पाणी फिरल्यासारखं वाटतं." परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच डळमळीत झाली आहे.

यंदा खतं, औषधं, मजुरी आणि वाहतुकीचा खर्च प्रचंड वाढला आहे. त्यात आता माकडांचा सततचा त्रास — त्यामुळे अनेक शेतकरी पुढे शेती करावी की करू नये या चिंतेंत आहेत. काही शेतकरी तर म्हणतात, "आमचं पीक पिकतंय की माकडांचं, हेच आता समजेनासं झालंय!"

वनविभागाकडे वारंवार तक्रारी केल्या जात आहेत, पण अद्याप ठोस उपाययोजना झालेली नाही. काही ग्रामपंचायतींनी लोकवर्गणीतून माकडांना हुसकावण्यासाठी ड्रम, फटाके किंवा रक्षक ठेवले आहेत; मात्र तो केवळ तात्पुरता उपाय ठरत आहे. माकडं पुन्हा दोन-तीन दिवसांत परत येतात आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीवर कुरघोडी करतात.

या त्रासामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढू लागला आहे. आगरवाडा येथील शेतकरी हरिश्चंद्र नाक्ती सांगतो, "आम्ही दिवसभर शेतात काम करून रात्रीसुद्धा रखवालदारी करतो. पण माकडं इतकी चलाख आहेत की आमच्या उपस्थितीतही लपून-छपून नुकसान करतात."

काही भागांमध्ये माकडांनी पिकाबरोबरच झाडावरील फळांनाही हानी पोहोचवली आहे. त्यामुळे एकूणच शेती आणि फळबागा दोन्हींचे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जर ही परिस्थिती अशीच राहिली तर पुढील दोन-तीन वर्षांत अनेक जण भातशेतीपासून दूर होतील.

शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ आर्थिक नाही, तर मानसिकही झाला आहे. वर्षभर मेहनत करून जेव्हा पीक तयार होतं, तेव्हा त्यात आपलं जगणं-उमेद असते. आणि ती उमेद माकडांच्या त्रासामुळे नष्ट होताना पाहून शेतकऱ्यांची मनं खचत आहेत.

या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि वनविभागाने संयुक्तपणे उपाययोजना आखण्याची गरज आहे. ग्रामस्तरावर 'पीकसंरक्षण समिती' स्थापन करून माकडांपासून संरक्षणासाठी योग्य धोरण राबवले, तरच शेतकऱ्यांचा विश्वास टिकेल.

# कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा





**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर रायगड**

**बेलापूर, नवी मुंबई :** जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कौटुंबिक न्यायालय, बेलापूर नवी मुंबई वकील संघटना आणि टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या प्रकल्पांतर्गत कार्यरत सुकून सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कौटुंबिक न्यायालयाचे माननीय न्यायाधीश मा. सुभाष कापरे यांनी भूषविले. नवी मुंबई वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुनील मोकल, उपाध्यक्ष ॲड. संदीप रामकर, सचिव ॲड. विकास म्हात्रे तसेच कमिटी सदस्य ॲड. नीलेश पाटील आणि ॲड. डिंपल चांद्रा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

सुकून सेंटरतर्फे श्रीमती सोनल बंडबे आणि श्रीमती क्षितिजा घन यांनी मानसिक आरोग्याची संकल्पना, मानसिक आजारांची कारणे, त्यांचे परिणाम आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर माहिती पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे दिली.कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविकाने होत असून त्यासाठी विवाह समुपदेशक श्री. भारत काळे यांनी भूमिका निभावली. उत्कृष्ट सूत्रसंचालनाची जबाबदारी ॲड. हेमांगी पाटील यांनी पार पाडली. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती नीलम भोसले यांनी मंचावरील मान्यवर, उपस्थित वकील वर्ग, न्यायालयीन अधिकारी-कर्मचारी आणि पक्षकार यांचे मनःपूर्वक आभार मानले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची समाप्ती जाहीर करण्यात आली.

# स्थानिक स्वराज्य संस्था डोळ्यासमोर ठेवून शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी सज्ज व्हा - आ. अब्दुल सत्तार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**

**सिल्लोड : -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक समोर ठेवून युवकांचे मजबूत संघटन करा, मजबूत बूथ यंत्रणा उभी करा, महिलांचे संघटन करा, वाडी वस्त्यांवर जावून संपर्क वाढवा, मतदार याद्या तपासा, कुठल्याही बुथ वर दगा फटका बसणार नाही याची दक्षता घ्या , जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर परिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन करीत आमदार अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या सिल्लोड - सोयगाव मतदारसंघात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

शिवसेनेचे मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात आम्ही सर्वच जागा लढू आणि प्रत्येक जागेवर विजय मिळवू असा विश्वास देखील आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला.

आज रविवार ( दि.12 ) रोजी सिल्लोड येथील शिवसेना भवन प्रांगणात आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना पक्षाचा प्रचार नारळाचा शुभारंभ तसेच नवनियुक्त सिल्लोड शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे यांचा सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते. कार्यक्रमात आमदार अब्दुल सत्तार यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.





याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, कृउबा समितीचे सभापती विश्वास दाभाडे, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार, किशोर अग्रवाल, देविदास लोखंडे ,श्रीराम महाजन, सुदर्शन अग्रवाल, देविदास पालोदकर ,नंदकिशोर सहारे, रामदास पालोदकर, मनोज झंवर, धरमसिंग चव्हाण, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पुष्पाताई गव्हाणे, उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, माजी नगराध्यक्षा राजश्री निकम, ध्रुपताबाई सोनवणे, शकुंतलाबाई बनसोड, मेघा शाह, डॉ. संजय जामकर , मनोज झंवर, संदीप राऊत, दारासिंग चव्हाण, श्रीरंग पाटील साळवे, जयराम चिंचपुरे ,सतीश ताठे ,अजित सेठ बागवान ,भाऊराव लोखंडे ,रमेश लाठी , दामू अण्णा गव्हाणे, नानासाहेब रहाटे, रउफ बागवान ,विनोद मंडलेचा, वकील वसईकर, प्रताप प्रसाद ,अक्षय मगर ,प्यारेलाल जयस्वाल, राजेंद्र ठोंबरे , हनिफ मुलतानी, संजय डमाळे, राजाराम पाडळे, कृष्णा पालोदकर, प्रशांत क्षीरसागर, गिरीश शाह ,नासिर हुसेन, सखाराम अहिरे, राजेश पालोदे, जगदीश बेदवे, कौतिकराव मोरे , दत्ता कुडके ,सुधाकर पाटील ,गणेश पा. गरुड ,रवी गायकवाड ,राम कटारिया, मुरलीधर काळे ,राजू बाबा काळे, मधुकर गवळी, लक्ष्मण तायडे, नजीर अहमद ,रमेश दांडगे ,शिवाप्पा चोपडे ,विठ्ठल सपकाळ , प्रशांत जोशी, नरसिंग चव्हाण, सुखदेव जाधव आदीसह विविध गावातील शिवसेना पक्षाचे आजी माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी , कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलत असतांना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, नेते घडविण्याचे काम कार्यकर्त्यांमध्ये असते, कार्यकर्त्यांनी विजयाचा निर्धार केल्यास विजय निश्चित असतो. प्रत्येक गावात गावातील प्रमुख, युवासेना व महिला अशी 25 जणांची टीम करा. येत्या 15 दिवसात जिल्हा परिषद गट, गण व प्रभाग निहाय प्रचार कार्यालय सुरू करा, आपल्या गावातून शिवसेनेला सर्वाधिक मतदान होईल यासाठी प्रभावी नियोजन करा अशा सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी दिल्या.

या कार्यक्रमात आमदार अब्दुल सत्तार यांनी विरोधकांचा त्यांच्या खास शैलीत जोरदार समाचार घेतला. विकासाचे ध्येय हे फक्त आपल्याकडेच आहे. विरोधक साधे एक टोपल मुरूम टाकू शकत नाही असा टोला आमदार अब्दुल सत्तार यांनी विरोधकांना लगावला. आतापर्यंतच्या निवडणुकीत विरोधकांनी सर्व प्रकारचे प्रयत्न करुन पाहिले पण मतदारांनी त्यांना थारा लागू दिला नाही. या निवडणुकीत देखील ते जातीवादाचा मुद्दा करून भूलथापांचे राजकारण करतील. त्यामुळे कार्यकर्त्यांनी संयम ठेवून आपआपली जबाबदारी पार पाडावी असे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले.अतिवृष्टी नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्यांना शासनाने दिवाळी पूर्वी मदत द्यावी तसेच 40 टक्के हुन कमी आणेवारी आलेली असल्याने प्रत्येकाला नुकसान भरपाई मिळावी अशी आपली मागणी आहे. दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळेल असे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी सांगितले. येत्या काळात पीकविमा भरलेल्या प्रत्येकाला लाभ मिळावा यासाठी आपली पुढिल लढाई ही पीक विमा कंपनी सोबत असेल असा इशारा आमदार अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या भाषणात दिला.

अर्जुन गाढे, अब्दुल समीर, केशवराव तायडे , दुर्गाबाई पवार, राजश्री निकम, मधुकर गवळी, अशा पदाधिकाऱ्यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे, आमदार अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली लढणार असून आमदार अब्दुल सत्तार जो उमेदवार देतील त्याच्या पाठीमागे एकदिलाने खंबीरपणे उभे राहून शिवसेनेच्या उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करु असा विश्वास यावेळी शिवसेना पदाधिकारी - कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल यांनी केले.

नंदकिशोर सहारे यांनी प्रास्ताविक तर शेवटी सोयगाव तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.






आज चिंधरण येते एमआयडीसी विरोधात बसलेल्या उपोषणकर्त्यांची शिवसेनेचे उपनेते मा श्री बबनदादा पाटील साहेब यांनी भेट घेऊन उपोषणकर्त्यांची विचारपूस करून त्यांच्या मागण्या संदर्भात चर्चा करून शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे पक्षाचा पाठिंबा उपोषणकर्त्यांना दिला यावेळी मा शिवसेना तालुकाप्रमुख श्री विश्वास पेटकर शिवसेनेचे प्रभाग क्रमांक दोनचे विभाग प्रमुख श्री प्रमोद पाटील श्री हिरामण भोईर व सोनावणे साहेब जीवन पाटील दादांच्या सोबत उपस्थित होते
( दैनिक युवक आधार )

## पनवेलमध्ये बालनाट्य शिबीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

मुलांनी मोबाइल आणि गेम्सपासून दूर रहावे, त्यांना अभिनयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे, त्यांच्यातून भावी कलाकार घडावेत, भविष्यात त्यांच्या हातून काही निर्मिती व्हावी यासाठी पनवेल कल्चरल सेंटरतर्फे शनिवार दि. 1 नोव्हेंबर आणि रविवार, दि. 2 नोव्हेंबर रोजी संस्थेच्या सभागृहात बालनाट्य शिबिराचे आयोजन केले आहे .

या शिबिरात अभिनय म्हणजे काय, अभिनयाचे प्रकार, नवरस आणि त्यांचे महत्त्व, बाल रंगभूमीचा इतिहास, मराठी व भारतीय रंगभूमीची संक्षिप्त ओळख, रंगमंचीय स्टेज आरेखन ओळख व प्रात्यक्षिक, चेहऱ्यावरील अवयवांचा व्यायाम, व्हॉइस-ओव्हर संदर्भात माहिती, पात्रानुसार बोलण्याची पद्धत कशी बदलत जाईल याची प्रात्यक्षिके, उस्फूर्तपणा म्हणजे काय, इम्प्रोवायझेशन कसं करावं अशा अनेक विषयांचं मार्गदर्शन करण्यात येईल. शिबीराच्या समारोपात शिबिरार्थींचे गट करुन त्यांना विषय देऊन त्यांच्याकडून उत्स्फूर्त सादरीकरण करवून घेतलं जाईल. रंगभूमी, दूरदर्शन मालिका आणि चित्रपट या तिन्ही क्षेत्रांचा अनुभव असलेले आणि स्वत: अभिनेता आणि दिग्दर्शक असलेले दीपक पवार हे या शिबीराचं संचालन करतील. हे शिबीर केवळ 6 ते 16 या वयोगटासाठीच असून यासाठी गुगल फॉर्म भरावा लागेल.

शिबिराचे शुल्क रु. 1,000 असून ते ऑनलाइन भरता येईल. 25 ऑक्टोबर 2025 पर्यंत प्राप्त होणाऱ्या पहिल्या केवळ 25 जणांनाच या शिबीरासाठी प्रवेश दिला जाईल. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी दीपक पवार 91522 19031 यांच्याशी संपर्क साधावा.

## शेतकरी व लाभार्थी कार्यकर्ता संवाद मेळावा

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी :-अनिल ससाने**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा परिषद सदस्य मा. शालीकराव म्हस्के यांच्या निरदर्शनाखाली शेतकरी व लाभार्थी कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय मंत्री मा.रावसाहेब पाटील दानवे हे होते दानवे म्हणाले की जाफराबाद तालुक्यातील विविध घरकुल योजना मध्ये घरकुल मंजूर असतान लाभार्थ्यांना अडीअडचणी येऊ नये म्हणून टेंभुर्णी सर्कल समिती स्थापन केलेली आहे या समितीमध्ये जिल्हा परिषद सदस्य शालिकराव म्हस्के ,भीमराव पाटील शिराळकर, लक्ष्मण शिंदे (मा. सरपंच)ज्ञानेश्वर पवार(माऊली) टेंभुर्णी सर्कल मध्ये घरकुलास काही अडीअडचणी असल्यास या समितीला संपर्क साधा असे आव्हान दानवे यांनी केली दानवे म्हणाले की अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे तोटे झाले आहे हे तोटे भरून काढण्यासाठी सरकारची मदत असली पाहिजे










जोपर्यंत सरकार शेतकऱ्याला मदत करणार नाही तोपर्यंत शेतकऱ्याचे तोटे भरून निघणार नाही हे शंभर टक्के खरे आहे तसे शेती हा व्यवसाय तोट्याचा आहे म्हणून सरकारने एक धोरण स्वीकारले आहे या देशाचे प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदी 2014 ला प्रधानमंत्री झाले त्यानंतर सर्वात जास्त पैसा खर्च झाला असेल तर तो शेतीवर खर्च झाला आहे मोदीजी म्हणाले होते की शेतकऱ्याचे उत्पन्न डबल कसे करता येईल यासाठी सरकारने उपाय योजना केले आहेत यामध्ये साडेबारा कोटी रुपये जालना जिल्ह्याला दिले 90% सबसिडी सोलार पंपावर व सिंचन योजनांवर केली आहे तसेच ट्रॅक्टर, रोटावेटर ,कल्टीवेटर , शेतीसाठी लागणारे अवजारे 40% सबसिडीवर केले आहे व याचबरोबर गरीब कल्याण योजना, देखील चालू केले गरिबांसाठी घरकुल मागील त्याला घर योजना देखील चालू केले आहे घरकुल योजनेमध्ये कुणी पैशाची मागणी केल्यास किंवा एखादा

अधिकारी म्हणाला की पैसे दिल्याशिवाय घरकुलाचे हप्ते टाकणार नाही तर टेंभुर्णी सर्कल समितीला संपर्क साधा समितीला नाही जमलं तर मला कॉल करा असे आवाहन दानवे यांनी केले कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित असलेले तालुक्यातील पदाधिकारी शालिकराव म्हस्के, नाना भागिले, मधुकर गाडे, राजू चव्हाण, दत्तू पंडित, मनोज शिंदे, संतोष लोखंडे, विजय परिहार ,उद्धव दोनगहू व इत्यादी टेंभुर्णी सर्कल मधील गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित होता

## रसायनी येथील शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला; खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते पक्षप्रवेश..



**दैनिक युवक आधार**
**खालापूर वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये आज (दि.12) रसायनी, ता. खालापूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस जनसंपर्क कार्यालयात पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रवादी विचारांवर आणि कोकण चे भाग्य विधाते सुनिल तटकरे नेतृत्वा विश्वास करत रायगड जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख दिपक इंगळे, लंकेश खवळे, रोहीत काळोखे, सूरज पाटील व नितीन पाटील यांच्यासह मा.सरपंच संदीप मुंढे व रायगड महिला जिल्हा अध्यक्षा उमा मुंढे यांच्या उपस्थितीत अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये पक्षप्रवेश केला.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या पक्षप्रवेशामुळे खालापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची संघटनात्मक ताकत अधिक वाढलेली दिसत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांशी असणाऱ्या पुरोगामी व लोकाभिमुख वैचारिक बांधिलकीमुळे पक्षाला संघटनात्मक बळकटी प्राप्त होत असल्याने आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत जनतेचा विश्वास अधिकाधिक पणे संपादित करण्यात राष्ट्रवादी काँग्रेस अग्रेसर होत आहे. कार्यक्रमाप्रसंगी पक्षातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## राजीप प्राथमिक शाळाचे लोकार्पण आ.महेंद्र थोरवे यांच्या हस्ते आनंदोत्सव जल्लोष करीत आ. महेंद्र थोरवे यांच्या स्वागतार्ह नव्या इमारतीचे उद्घाटन




**दैनिक युवक आधार**
**खालापूर वार्ताहर**

शेकडो वर्षे जुन्या शाळेच्या पुनर्बांधणी नंतर राजीप प्राथमिक शाळा हाळ खुर्द उर्दू शाळेच्या नव्या इमारतीचे भव्य उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी गावकरी व विद्यार्थ्यांनी आमदार थोरवे यांच्या स्वागतार्ह मोठ्या आनंद उत्साहाने कार्यक्रम नियोजित केले. फटाकड्यांच्या आतिषबाजीत पुष्प उजडीत आनंदाचा जल्लोष करीत आपल्याला आनंदाचे अविस्मरणीय प्रदर्शन करून सर्वांचे लक्ष वेधले.

गावातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेल्या हाळ या नव्या इमारतीचा भव्य उद्घाटन आमदार महेंद्रशेठ सदाशिव थोरवे यांच्या शुभहस्ते दिमाखात करण्यात आले. अध्यात्मिक,सांस्कृतिक वाचनातून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. सर्व मान्यवर पाहुण्यांचे स्वागत हिंदी,उर्दू व मराठीत स्वागत गीत साजरे करून केले .अश्याच प्रकारे मतदारसंघातील सर्व शाळेच्या विकासासाठी शक्य ते सहकार्य करण्याचे कार्य सुरू असल्याचे सांगत ग्रामीण, शहरात विद्या मंदिरातून शिक्षण हेच खऱ्या अर्थाने विकासाचे भक्कम अधिष्ठान आहे येथूनच पुढची पिढी घडेल मुलांच्या भवितव्यासाठी एक नवी दिशा ठरेल आणि यासाठी तुम्ही आम्ही सर्वांनी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे असे आमदार थोरवे यांनी सांगितले .माजी उपसरपंच अझीम मांडलेकर व त्याचे सर्व सहकारी गावाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करत असतात अश्या नेतृत्वाला साथ देत रहा असे ही ते पुढे म्हणाले. कार्यक्रमाला ग्रामपंचायत हाळ खुर्दचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षकवर्ग, पालक आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व पत्रकार उपस्थित होते. या वेळी उपसरपंच अझीम मांडलेकर यांनी सर्व साथ व सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानत छोटेखानी पाहुणचार करून कार्यक्रमाची सांगता केली.